१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, बुधवार १५ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-४१, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 41 Marathi - Daily - Mumbai, 15 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

दमानिया आज कोणता गौप्यस्फोट करणार ?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात

### बीएसएनएल, एमटीएनएल कर्मचाऱ्यांची उद्या निदर्शने

**मुंबई** - बीएसएनएल व एमटीएनएल या सरकारी टेलिकॉम कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना यंदाचा औद्योगिक महागाई भत्ता दिलेला नाही. जानेवारीपासून महागाई भत्ता न दिल्याने गुरुवार १६ एप्रिल रोजी कर्मचारी मुंबईत निदर्शने करणार आहेत व २० एप्रिल रोजी धरणे आंदोलन करणार आहेत. बारा पेन्शनधारकांच्या संघटनांच्या नेतृत्वात हे आंदोलन होईल. दुपारी १२.३० ते २.३० असे दोन तास १६ एप्रिल रोजी मुंबईत सांताक्रूझ (प) बीएसएनएल कार्यालय महाराष्ट्र व गोवा कार्यालय येथे निदर्शने केली जाणार आहेत. केंद्रीय सार्वजनिक उपक्रम विभाग यंदाचा महामाई भत्ता जाहीर केला आहे. हा महागाई भत्ता कर्मचाऱ्यांना वर्षात तीनदा दिला जातो. मात्र यंदा हा भत्ता दिलेलाच नाही. महागाई भत्ता मंजूर केला असला तर यंदा २७ फेब्रुवारीपासून नवा कायदा लागू झाला आहे. महागाई भत्ता मंजूर केल्यावर प्रत्येक उद्योगाशी संबंधित कंपनीने तो मंजूर करायचा आहे. जर उद्योग आर्थिक अडचणीत असेल तर कंपनी हा भत्ता नामंजूर करू शकते. मात्र कर्मचाऱ्यांचे पेन्शन हा त्यांचा अधिकार असल्याने तो डावलू शकत नाही.

### मस्साजोगमध्ये ५ उमेदवार निवडणूक बिनविरोध नाहीच

**बीड** - बीडच्या मस्साजोग गावच्या सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या सरपंचपदाची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता धुसर झाली आहे. संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांच्या विरोधात चार उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. मस्साजोगच्या गावकऱ्यांकडून निवडणूक बिनविरोध व्हावी अशी मागणी होत असतानाही त्यांच्या विरोधात इतर चार उमेदवार रिंगणात उतरले आहेत. सरपंचपदासाठी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांमध्ये अश्विनी देशमुख, स्वरूपानंद देशमुख, संजीवनी देशमुख, पंजाब देशमुख आणि करुणा स्वरूपानंद देशमुख यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, एकाच कुटुंबातील किंवा जवळच्या नात्यातील उमेदवारांनी अर्ज भरल्यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार की समन्वयातून मार्ग निघणार, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे. पाच उमेदवारांमध्ये अश्विनी देशमुख या विजयाच्या प्रमुख दावेदार मानल्या जात आहेत.

### सोने-चांदीच्या दरात मोठी वाढ

**मुंबई** - आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि जागतिक अस्थिरतेमुळे सोने-चांदीच्या दरात आज मोठी वाढ झाली. सोने प्रति तोळा १ लाख ५६ हजार ते १ लाख ५७ हजार रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचले.



तर चांदीच्या दरातही प्रति किलो १० ते ११ हजार रुपयांची वाढ झाली. मध्य पूर्वेतील तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ होत चालली आहे.त्यामुळे आंतरराष्ट्रीय भांडवली बाजारात अस्थिरतेचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत सुरक्षित मानल्या जाणाऱ्या सोन्यामध्ये गुंतवणूक करण्याकडे गुंतवणूकदारांचा कल वाढला आहे.

# अमेरिकेने इराणला घेरले! शांततेचाही प्रयत्न

## उद्या दोन्ही देशांच्या प्रतिनिधींची पुन्हा बैठक होणार

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल इशारा दिल्यानुसार त्यांनी आजपासून इराणला घेरण्यास सुरूवात केली. अमेरिकेच्या १५ अजस्त्र युद्धनौकांनी इराणला चहुबाजूंनी वेढा घातला आहे. या युद्धनौकांवर एफ ३५ लढाऊ विमाने तैनात आहेत. कोणत्याही क्षणी हल्ला करण्यासाठी ही विमाने सज्ज आहेत. दुसरीकडे इराणनेही आपल्या एकाही बंदरावर हल्ला झाला तर फारसची खाडी आणि ओमानच्या सागरी हद्दीतील एकही बंदर सुरक्षित राहणार नाही, असा सज्जड इशारा अमेरिकेला दिला आहे. त्यामुळे युद्ध चिघळण्याची चिन्हे दिसत असताना आशेचा किरणही दिसला. अमेरिका आणि इराण दरम्यान गुरुवारी चर्चेची दुसरी फेरी होणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. कायमस्वरूपी युद्धविराम करण्यासाठी होणारी ही बैठक बऱ्यापैकी यशस्वी होईल, असा दावाही केला जात आहे.**



■ वॉशिंग्टन

**अमेरिका** इराणकडे जाणाऱ्या आणि इराणमधून बाहेर पडणाऱ्या एकाही जहाजाला नाकेबंदीतून जाऊ देणार नाही, असा इशारा आज ट्रम्प यांनी दिला. ट्रम्प यांनी कालच स्पष्ट केले होते की, नाकेबंदीमधून इराणशी व्यापारी संबंध ठेवणाऱ्या अन्य देशांच्या जहाजांनाही सवलत दिली जाणार नाही. ट्रम्प यांच्या या भूमिकेमुळे चीन नाराज झाला आहे. चीन हा इराणकडून कच्चे तेल घेणारा एक मोठा ग्राहक देश आहे. चीनने अमेरिकेला थेट इशारा दिला आहे की, इराणसोबत आमचे पुर्वीपासूनचे व्यापारी संबंध आहेत. त्यामुळे अमेरिकेने आमच्या अंतर्गत मामल्यामध्ये ढवळाढवळ आम्ही खपवून घेणार नाही.

दरम्यान, युद्धविरामाच्या चर्चेबद्दल बोलताना इराण सरकारचे प्रवक्ते फातेमेह मोहाजेरानी यांनी सांगितले की, आम्हाला शांतता हवी आहे. परंतु आमच्या काही अटी आहेत. युरेनियम समृद्धीकरणाचा » पान ७ वर

### मोदी - ट्रम्प यांच्यात ४० मिनिटे चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात सुमारे ४० मिनिटे फोनवर चर्चा झाली. अमेरिका-इराण युद्धविरामानंतर दोन्ही नेत्यांमधील ही पहिलीच चर्चा होती. तर २० दिवसांतील त्यांच्यातील ही दुसरी चर्चा आहे. या चर्चेविषयी मोदी यांनी एक पोस्ट करून म्हटले की, माझे मित्र राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा फोन आला. आम्ही विविध क्षेत्रांतील आमच्या द्विपक्षीय सहकार्यात झालेल्या भरीव प्रगतीचा आढावा घेतला. आम्ही सर्व क्षेत्रांमध्ये आमची व्यापक जागतिक सामरिक भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही पश्चिम आशियातील परिस्थितीवरही चर्चा केली आणि होर्मुजची सामुद्रधुनी खुली व सुरक्षित ठेवण्यावर भर दिला.

## बिहारमध्ये पहिल्यांदाच भाजपाचा मुख्यमंत्री

### आज शपथविधी होणार



**बिहारमध्ये पहिल्यांदाच भाजपाचा मुख्यमंत्री होणार आहे. दोन वेळा उपमुख्यमंत्री असलेले भाजपाचे सम्राट चौधरी बिहारचे नवे मुख्यमंत्री म्हणून उद्या सकाळी ११ वाजता लोकभवनात शपथ घेतील. जदयूचे नीतीशकुमार यांनी आपल्या कार्यकाळातील शेवटची कॅबिनेट बैठक आज घेतली. त्यानंतर त्यांनी राज्यपालांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा सादर केला. राज्यपालांनी तो स्वीकारला.**

■ पटना

**नीतीश**कुमार यांचे पुत्र निशांत कुमार यांनी उपमुख्यमंत्रिपद स्वीकारण्यास नकार दिल्याचे वृत्त आहे. नीतीशकुमार यांच्यानंतर त्यांचे पुत्र मुख्यमंत्री होतील अशी जदयूच्या कार्यकर्त्यांची अपेक्षा होती.

आज भाजपा विधानमंडळ सदस्य बैठक झाली. भाजपाचे वरिष्ठ नेते विजय सिन्हा यांनी विधानमंडळ पक्ष नेतेपदी सम्राट चौधरी यांचे नाव प्रस्तावित केले. त्यानंतर रेणु देवी, मंगल पांडेय, दिलीप जायसवाल यांसह इतर आमदारांनी त्यास मंजुरी दिली आणि सम्राट चौधरी यांची सर्वानुमते निवड झाली. राजद, जदयू आणि भाजपा असा प्रवास करत भाजपात आलेले सम्राट चौधरी हे बिहारचे नवे मुख्यमंत्री होणार आहेत. भाजपा पहिल्यांदाच बिहारमध्ये स्वतःचा मुख्यमंत्री देत आहे. विधिमंडळ पक्षाचा नेता म्हणून निवड झाल्यानंतर सम्राट चौधरी यांनी भाजपाच्या सर्व नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. त्यांनी म्हटले की, गेल्या २० वर्षांपासून मी राजकारणात सक्रिय आहे, पण यापूर्वी कोणतीही ठोस विचारधारा » पान ७ वर

## नोएडात कामगार आंदोलन सुरूच

### ३५० पेक्षा अधिक जणांना अटक

■ नोएडा

**पगारवाढीच्या** मागणीसाठी काल झालेल्या हिंसक आंदोलनानंतर आज दुसऱ्या दिवशीही कामगारांनी



रस्त्यावर उतरून आंदोलन केले. यावेळी पोलीस आणि कामगार यांच्यात पुन्हा एकदा झटापट आणि दगडफेक झाली. पोलिसांनी ३५० पेक्षा अधिक जणांना अटक केली आहे. त्यानंतर सर्वत्र पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला.

सकाळी ९ वाजता फेज-२ मधील सेक्टर-८० भागात दगडफेक झाली. पोलिसांनी

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

लाठीमार केल्यानंतर जमाव पांगला. फरीदाबादमधील सेक्टर-३७ येथील मदरसन कंपनीसमोर आज पुन्हा आंदोलन झाले. » पान ७ वर

## शिक्षकांना वाढीव अनुदानाबरोबरच

### ६ टक्के व्याजासह थकीत रक्कम द्या

■ मुंबई

**शिक्षण** विभागाच्या तांत्रिक चुकांमुळे आणि वारंवार बदलणाऱ्या धोरणांमुळे गेल्या अनेक वर्षांपासून हक्काच्या अनुदानापासून वंचित राहिलेल्या नाशिकमधील सात शिक्षकांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला दिला. न्या. रवींद्र घुगे व न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठाने शिक्षण विभागाने सुरुवातीला चूक केली नसती, तर याचिकाकर्ते शिक्षक आज इतर सहकाऱ्यांप्रमाणे ८० टक्के अनुदानाचा लाभ घेत असते असे खडेबोल सुनावत हायकोर्टाने शिक्षण विभागाच्या कारभारावर

**उच्च न्यायालयाचा आदेश**

ताशेरे ओढले तसेच या शिक्षकांना वाढीव अनुदान देण्याबरोबरच ६ टक्के व्याजासह थकीत रक्कम ३१ मे पर्यंत देण्याचे आदेश दिले.

नाशिकच्या अंबड येथील 'नूतन प्राथमिक विद्यामंदिर' मधील सात शिक्षकांना सरकारच्या मनमानी कारभाराचा फटका बसल्याने त्यांनी अ‍ॅड. संजीव देवरे, अ‍ॅड. सुचिता पवार यांच्यामार्फत हायकोर्टात याचिका दाखल केली. या याचिकेवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाने शिक्षण विभागाच्या कारभाराचा चांगलाच समाचार घेतला. शासनाने एकदा चूक सुधारण्याचे आश्वासन देऊन पुन्हा तसाच चुकीचा निर्णय घेतल्याने » पान ७ वर

## मध्य रेल्वे भरतीत १९ वर्षांचा विलंब

### उमेदवारांचे आझाद मैदानात उपोषण

■ मुंबई

**मध्य** रेल्वे भरती प्रक्रियेत २००७ साली परीक्षा उत्तीर्ण होऊन १९ वर्षे उलटली तरी अद्याप नियुक्ती न झालेल्या तरुणांनी आंदोलनाची घोषणा केली आहे. हे उमेदवार सोमवार २० एप्रिल रोजी आझाद मैदान येथे एकदिवसीय उपोषण करणार आहेत. मध्य रेल्वेच्या जनरल मॅनेजर यांना समितीमार्फत निवेदन सादर करण्यात येणार आहे.

२००७ मध्ये मध्य रेल्वेसह भारतीय रेल्वेमध्ये रेल्वे भरती बोर्डामार्फत विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबवण्यात आली होती. इंजिनिअरिंग, तिकीट कलेक्टर, गँगमन आणि की-मॅन अशा पदांसाठी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. यात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी २०११ मध्ये शारीरिक चाचणीही पूर्ण केली. परंतु पद रिकामी नाहीत म्हणत त्यानंतरही त्यांची नियुक्ती करण्यात आली नाही.

उमेदवार संदीप पाल म्हणाले की, आम्ही २००७ मध्ये परीक्षा उत्तीर्ण झालो. त्यानंतर २०११ मध्ये आमची शारीरिक चाचणी झाली. पण त्यानंतरही आम्हाला नियुक्ती देण्यात आलेली नाही. आम्ही २० टक्के अतिरिक्त उमेदवार असल्याचे रेल्वेने सांगितले. परंतु त्यानंतर रेल्वेने आमच्यानंतर २०१९ च्या भरतीतील यशस्वी उमेदवारांची नियुक्ती केली, आम्हाला संधी दिली नाही. या संदर्भात आम्ही न्यायालयातही दाद मागितली.

## नेस्को सेंटर ड्रग सेवन प्रकरणातील

### ड्रग पुरवठादारासह ६ जणांना अटक

■ मुंबई

**मुंबईच्या** नेस्को सेंटर येथील संगीत कार्यक्रमात ड्रग सेवन केल्याने दोन विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या घटनेने खळबळ उडाल्यानंतर मुंबई पोलिसांनी यामागील ड्रग रॅकेट शोधून काढले आहे. पोलिसांनी ड्रग पुरवठादार आनंद पटेल याला अटक केली आहे. आनंदसह एकूण सहा आरोपींना अटक करण्यात आली असून आज त्यांना न्यायालयात उभे केले असता १६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली. ड्रग प्रकरणातील एक विद्यार्थिनी अजूनही रुग्णालयात असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

११ एप्रिलच्या शनिवारी नेस्को सेंटर येथील हॉल क्रमांक ४ मध्ये '९ टाईम्स ९' या मोठ्या संगीत जलशाचे (कॉन्सर्ट) आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम नेस्को आणि इन्स्पायरिंग टाय कंपनीने आयोजित केला होता.



या कार्यक्रमासाठी सुमारे २ हजार रुपये प्रवेश शुल्क आकारण्यात आले होते. या कॉन्सर्टला खास कॉलेज तरुणांची मोठी गर्दी उसळली होती. त्यामुळे सुरक्षा व्यवस्थेचा पूर्ण » पान ७ वर

## ६१५८ कोटी रुपयांचे कर्ज थकीत

### व्हिडिओकॉनचे धूत दिवाळखोरीत

■ नवी दिल्ली

**नॅशनल** कंपनी लॉ ट्रिब्युनलने व्हिडिओकॉनचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक व शिवसेनेचे माजी खासदार वेणुगोपाल धूत यांच्याविरुद्ध ६१५८ कोटी रुपयांच्या कर्ज थकबाकी प्रकरणी दिवाळखोरी प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. ते दोन समूह कंपन्यांचे वैयक्तिक हमीदार होते.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अर्जावर सुनावणी करताना नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल म्हणजेच एनसीएलटीने म्हटले आहे की, वेणुगोपाल धूत यांनी आर्थिक कर्जदाराने दिलेल्या कर्जाची परतफेड केली नाही. व्हिडिओकॉन इंडस्ट्रीज लिमिटेड आणि व्हिडिओकॉन टेलिकम्युनिकेशन्स लिमिटेडचे ते वैयक्तिक हमीदार आहेत. मात्र ते कर्जाची परतफेड करण्यात अपयशी झाले आहेत असे एनसीएलटीच्या ८ एप्रिलच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. मुंबई खंडपीठाने असीश नारायण यांची रिझोल्यूशन प्रोफेशनल म्हणून नियुक्ती केली असून या आदेशानंतर सात दिवसांच्या आत एनसीएलटीच्या वेबसाईटवर सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

## डोक्यावर कॅमेरा! कामगारांचा व्हिडिओ

### कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तयारीची चर्चा

**डोक्यावर कॅमेरा लावलेल्या भारतीय कारखान्यातील कामगारांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. हा कॅमेरा वापरून कृत्रिम बुद्धिमत्तेला या कामाचे प्रशिक्षण दिले जात आहे का यावर चर्चा सुरू झाली आहे, असे असेल तर भविष्यात आपल्या नोकऱ्या जाण्याची भीती कामगारांना वाटू लागली आहे.**



■ नवी दिल्ली

**लांब** रांगांमध्ये बसलेले कामगार शिवणकाम किंवा कापड हाताळताना दिसतात. पण त्यांच्या डोक्यावर लावलेले छोटे कॅमेरे लक्षात येताच संपूर्ण दृश्य वेगळे वाटू लागते. हेच लोकांचे लक्ष वेधून घेत आहे.

हा व्हिडिओ ऑनलाईन व्हायरल झाल्यानंतर लोक विचार करू लागले की, कारखान्यांना इतक्या तपशीलवार पद्धतीने रोजच्या कामाचे रेकॉर्डिंग का करायचे आहे? अनेक लोक एक्सवर अंदाज व्यक्त करत आहेत की हा डेटा एआय प्रणालीला प्रशिक्षण देण्यासाठी वापरला जाऊ शकतो. कामगार जे काम करतात ते अचूकपणे कॅमेरा रेकॉर्ड करतात. यामुळे मशीनना शिकण्यासाठी मोठा डेटा मिळतो. मशीन जलद गतीने शिकू लागली, तर तीच कामे भविष्यात मशीनकडून केली जातील का?

या मुद्याची दुसरी बाजूही आहे. काही लोकांचे मत आहे की, हा तंत्रज्ञानातील बदलाचा एक टप्पा आहे. उद्योग नेहमी » पान ७ वर

## एसआयआरमध्ये नावे गाळलेल्यांना

### मतदान करण्याचा अधिकार नाही

■ नवी दिल्ली

**पश्चिम** बंगालमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीमध्ये (एसआयआर) नावे रद्द करण्यात आलेल्या लाखो लोकांना २३ एप्रिल रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करता येणार नाही. त्यांच्या वतीने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, नावे वगळलेल्या लोकांना मतदान करू देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे.

पश्चिम बंगालमध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वतीने करण्यात आलेल्या एसआयआरमध्ये लाखो लोकांना बेकायदेशीर ठरवून त्यांची नावे रद्द करण्यात आली आहेत. त्यापैकी १६ लाख लोकांनी

**सुप्रीम कोर्टाचा निर्वाळा**

येत्या विधानसभा निवडणुकीत मतदान करू देण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा या लोकांना पाठिंबा आहे असून त्यांनी हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात उपस्थित केला.

या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखाली खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी कोलकाता सरकारच्या वतीने तृणमूल काँग्रेसचे नेते आणि वकील कल्याण बॅनर्जी



यांनी युक्तिवाद केला. यासंदर्भात सुमारे १६ लाख अपील दाखल करण्यात आली आहेत. ही सर्व अपील प्रलंबित आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने दाखल करण्यात आलेल्या अपिलांवर लवकर निर्णय होणे शक्य नाही.

# सुनेत्रा वहिनींसाठी धावाधाव

**डॉ. सुकृत खांडेकर**

**अजित पवार यांच्या २८ जानेवारी रोजी विमान अपघातात झालेल्या मृत्युनंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात येत्या २३ एप्रिल रोजी निवडणूक होत आहे. अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आहेत. अजितदादा हे राज्याचे उपमुख्यमंत्री होते, राष्ट्रवादी काँग्रेस (अप) चे राष्ट्रीय अध्यक्ष होते. बारामतीतून आठ वेळा विधानसभेवर आमदार म्हणून निवडून आले होते. स्वत:च्या हिमतीवर त्यांनी आपल्या पक्षाचे ४२ आमदार निवडून आणले.**



**राज्याच्या** राजकारणात त्यांनी स्वत:चे वेगळे नि भक्कम स्थान निर्माण केले होते. राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या व केंद्रात अनेक वर्षे संरक्षण व कृषी मंत्री राहिलेल्या शरद पवारांचे ते पुतणे होते. काकांच्या पक्षापासून त्यांनी फारकत घेतली तरी त्यांच्याशी कौटुंबिक नाते संबंध शेवटपर्यंत कायम ठेवले होते. आपल्या कार्यक्षम, तडफदार व शिस्तबध्द कार्यपध्दतीने त्यांनी सार्वजनिक जीवनात ठसा उमटवला होता. कार्यकर्त्यांची काळजी घेणारा नेता अशी त्यांची प्रतिमा होती. अशा वलयांकित अजितदादांचे राजकीय वारस म्हणून सुनेत्रा वहिनींवर जबाबदारी आली आहे. दादांच्या आकस्मिक मृत्युनंतर चौथ्या दिवशी त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली तेव्हा किमान दहा दिवस तरी थांबायला नको होते का, अशी त्यांच्यावर टीका झाली. दादांच्या निधनानंतर दोन महिन्यांच्या काळात त्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष झाल्या, त्यांचे चिरंजीव पार्थ हे राज्यसभेचे खासदार झाले. अजितदादांच्या पत्नी, पवार कुटुंबाचे वलय आणि अजितदादांच्या आकस्मिक मृत्युने निर्माण झालेली सहानुभुती यातूनच वहिनींना बिनविरोध निवडून आणण्यासाठी राजकीय नेत्यांची कशी धावाधाव चालू होती हे सर्व महाराष्ट्राने पाहिले.

स्वत: सुनेत्रा पवार यांनी प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ किंवा उबाठा सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरेंशी संपर्क साधून बिनविरोध निवडून देण्याचे आवाहन केले, यात काहीच गैर नाही. बारामती व कौटुंबिक नाते संबंधामुळे शरद पवारांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना फोन करून त्यांच्या पक्षाने माघार घ्यावी अशी विनंती केली तेव्हा काँग्रेसने शरद पवारांना तत्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला. शरद पवारांनी केलेल्या एका फोननंतर चक्रे वेगाने फिरली. काँग्रेस पक्ष हा महायुतीत नाही. काँग्रेसला महायुतीच्या विरोधात निवडणूक लढविण्याचा पूर्ण अधिकार आहे. काँग्रेसने संकेत किंवा परंपरा पाळली नाही म्हणून भाजपाच्या नेत्यांनी थयथयाट केला. काँग्रेसने महाराष्ट्राची राजकीय संस्कृती पाळली नाही म्हणून अनेकांनी टाहो फोडला, पण ज्यांनी असा आक्रोश केला त्यांनी आमदाराच्या मृत्युनंतर राज्यात झालेल्या पोटनिवडणुकीत आपल्या पक्षाचे उमेदवार उभे केले अशी बरीच उदाहरणे देता येतील. काँग्रेसने शेवटच्या क्षणी बारामतीतून माघार घेतल्यानंतर हात दाखवून अवलक्षण किंवा गाढव गेलं नि ब्रह्मचर्यही गेले अशा शब्दात भाजपाने टवाळी केली. त्यावर आमचा विरोध भाजपाला आहे म्हणून आम्ही निवडणूक लढविण्याचे ठरवले होते, असे सकपाळ यांनी स्पष्टीकरण दिले.

सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यावर त्यांच्या पक्षातच सारे काही आलबेल नाही असे अनेकदा दिसून आले. त्या जेव्हा दिल्लीला गेल्या, तेव्हा प्रफुल्ल पटेल किंवा सुनील तटकरे त्यांच्यासोबत विमानतळावर दिसले नाहीत. तटकरे यांच्या रायगडमधील किंवा पटेल यांच्या विदर्भातील सभेत बॅनरवरून अजितदादांचे फोटो गायब होते. सुनेत्रा पवारांनी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात पटेल, तटकरे यांच्या नावापुढे त्यांच्या पदांचा उल्लेख नव्हता. त्यातून पुन्हा पार्थ यांनी काँग्रेसने बारामतीतून माघार घ्यावी, म्हणून आम्ही कोणी त्यांना फोन करणार नाही, असा बाणा दाखवला. काँग्रेसचा महाराष्ट्रात डाऊन फॉल होत आहे असे बोलून ऐन निवडणुकीत काँग्रेसला अंगावर घेतले व नव्या वादाला तोंड फोडले. एकीकडे सुनेत्रा वहिनींची बिनविरोध निवड व्हावी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शरद पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, सुप्रिया सुळे, रोहित पवार असे अनेकजण प्रयत्न करीत होते व दुसरीकडे खासदार पार्थ त्यावर पाणी ओतताना दिसले. स्वत: रोहित पवार यांनी पार्थ यांच्यावतीने दिलगिरी व्यक्त करून वादावर पडदा पाडण्याचा प्रयत्न केला.

खासदार झाल्यावर पार्थ यांच्या बोलण्यात अहंकार निर्माण झाला आहे की राजकीय परिपक्वता नव्हती? त्यांचे पिताश्री अजित पवारांनी १९९१, १९९२ मध्ये काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवली व जिंकली होती. १९९९ ते २००४ या काळात काँग्रेसप्रणित महाआघाडीच्या सरकारमध्ये अजितदादा मंत्री होते याचा पार्थ यांना विसर पडलेला असावा. राष्ट्रवादी काँग्रेसचे बहुतेक नेते हे काँग्रेसच्या माध्यमातूनच मोठे झाले आहेत हे पार्थ यांना ठाऊक नसावे.

सुप्रिया सुळेंनीही आपल्या नव्याने खासदार झालेल्या पुतण्याचे कान टोचले. त्या म्हणाल्या, भारतीय राजकारणात व भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत काँग्रेसचे योगदान फार मोठे आहे. देशाच्या पंतप्रधानापासून ते ग्रामपंचायतीच्या सरपंचापर्यंत, महिला आरक्षणापासून ते देशाने जिंकलेल्या युद्धापर्यंत काँग्रेसची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. लोकशाहीत प्रत्येकाला मत मांडण्याचा अधिकार असला तरी मर्यादांचे भान राखले पाहिजे. आम्ही सर्वांनी काँग्रेसला जवळून पाहिले आहे. मी अनेकदा काँग्रेसच्या साथीने निवडून आले आहे. मी आणि अजितदादा आम्ही दोघेही काँग्रेसच्या तालमीतच लहानाचे मोठे झालो आहोत

काँग्रेसने उमेदवारी मागे घेताना सन २०२९ मध्ये बारामतीतून काँग्रेस लढणार असे जाहीर करून टाकले. तोपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस (अप) व शिवसेना (शिंदे) या भाजपाच्या मित्र पक्षांची काय अवस्था असेल त्याची आतापासूनच झलक दिसू लागली आहे. अजितदादा हयात असताना ते कधी भाजपाबरोबर फरफटताना दिसले नाहीत. मोदी-मोदी अशी माळ त्यांनी भाषणात ओढली नाही.

आपल्या पक्षाचा अजेंडा वेगळा आहे, विचारसरणी वेगळी आहे, याचे भान त्यांनी कायम ठेवले. यापुढे सुनेत्रा पवारांच्या नेतृत्वाखालील पक्षाला भाजपा तेवढी मोकळीक देणार आहे का? अजितदादांच्या विमानअपघाती मृत्यूनंतर राज्यात पोलीस स्टेशनवर साधा एफआयआर नोंदवला गेलेला नाही, रोहित पवार मुंबई व बारामतीत एफआयआर नोंदवायला गेले तेव्हा पोलिसांनी कसा नकार दिला हे सर्व राज्याने बघितले आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनात अजितदादांच्या विमान अपघाती मृत्युवर चर्चासुध्दा घडवली गेली नाही. स्वत: उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांनी मागणी करूनही तपास सीबीआयकडे सोपवला गेला नाही. मग भाजपाने त्यांच्यासाठी काँग्रेसने बारामतीत माघार घ्यावी अशी विनंती करणे हा केवळ उपचार होता काय?

गोपीनाथ मुंडे यांच्या अपघाती निधनानंतर त्यांची कन्या प्रितम या बीड मतदारसंघातून ७ लाखाच्या विक्रमी मताधिक्क्याने खासदार म्हणून निवडून गेल्या होत्या. आर. आर. आबापाटील यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुमन या तासगावमधून विधानसभेवर १ लाख १२ हजार मतांनी विजयी झाल्या होत्या. पतंगराव कदम यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र विश्वजित पलुस- कडेगाव मतदारसंघातून विधानसभेवर बिनविरोध निवडून आले होते. शिवसेनेचे बाळा सावंत यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी तृप्ती मुंबईतील वांद्रे पूर्वमधून १९५०० मतांनी आमदार म्हणून विजयी झाल्या होत्या. मुंबईतील अंधेरी पूर्वमधून शिवसेनेचे रमेश लटके यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी ऋतुजा विजयी झाल्या होत्या. नांदेडमधून वसंतराव चव्हाण यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र रवींद्र निवडून आले होते. बारामतीतून सुनेत्रावहिनी यांचा विजय पक्का आहेच पण मताधिक्य किती दिड की दोन लाख हे ४ मे रोजी समजेल.

# आता दंडाची पावती असल्यास फेरीवाला क्षेत्रात जागा मिळणार

## मुंबईतील २२ हजार फेरीवाल्यांना लाभ

मुंबई

**आता** केवळ दंडात्मक कारवाईची पावती असणाऱ्या फेरीवाल्यांनाही फेरीवाला क्षेत्रात जागा उपलब्ध होणार आहे. पालिका प्रशासनाने शहरातील ३२ हजार फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये पालिकेच्या अनुज्ञापन विभागाचा परवाना असलेल्या १० हजार आणि केवळ दंडाची पावती असलेल्या २२ हजार फेरीवाल्यांचा समावेश आहे.

मुंबईतील हजारो फेरीवाले १५ ते २० वर्षांपासून ज्याठिकाणी आपला व्यवसाय करत आहेत. त्याठिकाणी त्यांच्यावर पालिका अनेकदा दंडात्मक कारवाई करत असते. त्यांच्याकडे अनुज्ञापन विभागाचा रितसर परवाना नाही म्हणून ही कारवाई केल्याचे सांगितले जाते. परंतु आता याच फेरीवाल्यांना फेरीवाला क्षेत्रात जागा उपलब्ध करून मिळणार आहे. यातील पात्र फेरीवाल्यांची जागा 'शहर पथविक्रेता समिती' निश्चित करणार आहे. यात २०१४ चे पुरावे सादर करणाऱ्या फेरीवाल्यांना जागा मिळणार आहे. जागा निश्चित झाल्यानंतर



त्याच्या बाजूला दुसरा फेरीवाला बसल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे. मुंबईतील पथविक्रेता समितीच्या निवडणुकीचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. त्यातील ८ झोनमध्ये सदस्य निवड झाली आहे. स्वीकृत सदस्याची निवड बाकी आहे.

# पालिकेच्या नायर रुग्णालयात कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती

मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या नायर रुग्णालयात बहुउद्देशीय कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात १७१ कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. सध्या नायर रुग्णालयात कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने त्याचा थेट परिणाम रुग्णांवर होताना दिसत आहेत. त्यामुळे या रुग्णालयात बहुद्देशीय कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती केली जाणार आहे. यासाठी या कर्मचाऱ्यांना दरमहा २९ हजार ३६२ रुपये इतका पगार दिला जाणार आहे. या रुग्णालयातील ज्या विभागात कर्मचाऱ्यांची कमतरता भासेल, अशा ठिकाणीच ही कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. नायर रुग्णालयासह पालिकेच्या अन्य रुग्णालयातही अशी बहुउद्देशीय कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा पालिकेचा विचार आहे.

# समृद्धी महामार्गावर अपघात एकाचा आगीत होरपळून मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर** - छत्रपती संभाजीनगरजवळील समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा आगीत होरपळून मृत्यू झाला. छत्रपती संभाजीनगरजवळ समृद्धी महामार्गावर कारने एका ट्रकला जोरदार धडक दिली. धडकेनंतर कार सुमारे १०० फूट फरफटत गेली. अपघातानंतर कारमधील दोन प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. पण चालकाचे पाय अडकल्यामुळे त्याला बाहेर काढण्यात अडचणी येत होत्या. बचावकार्य सुरू असतानाच कारने अचानक पेट घेतला आणि मोठा भडका उडाला.



# निवृत्तीनाथांच्या समाधीला अभंगाच्या साथीने चंदनाची उटी

त्र्यंबकेश्वर

**वाढत्या** उन्हाची दाहकता कमी करण्यासाठी दरवर्षी संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या संजीवन समाधीला आणि गर्भगृहातील अन्य देवतांच्या मूर्तीला चंदनाचा शीतल लेप लावण्याची गेल्या अनेक वर्षांची परंपरा आहे. यंदाही ही परंपरा मोठ्या भक्तिभावाने पार पडली. यावेळी टाळ मृदुंगाच्या साक्षीने अभंग गात ही उटी लावण्यास प्रारंभ करण्यात आला. चैत्र वद्य एकादशीला श्री संत निवृत्तीनाथ महाराजांची संजीवन समाधी व मंदिराच्या गर्भगृहातील विठ्ठल रुक्मिणी,आदिशक्ती मुक्ताबाई यांच्या मूर्तीना चंदनाच्या उटीचे पारंपरिक पद्धतीने लेपन करण्यात येते. सुमारे दिडशे वर्षांपूर्वी एका वारकरी महिलेने ही परंपरा सुरू केली होती. ती आजपर्यंत अखंडपणे सुरू आहे. यानिमित्त सालाबादप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्याअंतर्गत गेले ७ दिवस शेकडो महिलांनी ओवी अभंग गात दगडाच्या सहाणीवर चंदन घासून उटी तयार केली होती. काल दुपारी २ वाजता टाळ मृदुंगाच्या साक्षीने ही चंदनाची उटी लावण्यास प्रारंभ करण्यात आला. यावेळी हरिनामाच्या जयघोषाने मंदिर परिसर दणाणून गेला. यानंतर देवांना नवीन पोशाख करून साजशृंगार करण्यात आला. फळांचा नैवेद्य अर्पण करुन नाथांची आरती करण्यात आली. नाथांच्या दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# मुंबई-गोवा महामार्ग होण्यास आणखी चार महिने लागणार?



मुंबई

**केंद्रीय** मंत्री नितीन गडकरी यांनी मे अखेरपर्यंत मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण करण्याची डेडलाईन दिली आहे. मात्र कामे अपूर्ण असल्याने प्रकल्पाला आणखी चार महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

संगमेश्वर ते पळस्पे या महत्त्वाच्या पट्ट्यात अद्यापही अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत. विशेषतः संगमेश्वर ते रत्नागिरी या दरम्यानच्या भागात रस्त्यांची कामे, पूल आणि इतर पायाभूत सुविधा पूर्ण झालेल्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांना अजूनही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. महामार्ग पूर्ण होण्याबाबत वारंवार अंतिम मुदत दिली जात असली, तरी प्रत्यक्षात काम पूर्ण झालेलेच नाहीत. कामांमध्ये होणारा विलंब, तांत्रिक अडचणी आणि हवामान यामुळे प्रकल्प लांबणीवर पडत असल्याची माहिती आहे.

# जव्हारच्या काळ मांडवी धबधब्यात तरुणाचा मृत्यू

**जव्हार**- सोशल मीडियावरील आकर्षक रीलच्या मोहात पडून जव्हार येथील काळ मांडवी धबधब्यावर पोहायला गेलेल्या १८ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मृत तरुणाचे नाव नयन कुमार सिंग असे आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत नयनचा मित्र चंदन यादवने काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर काळ मांडवी धबधब्याची रील पाहिली होती. रीलमध्ये दिसणारे आकर्षक दृश्य पाहून प्रत्यक्ष ठिकाणाच्या धोक्याचा अंदाज न घेता यादव हा आपल्या तीन मित्रांसह या धबधब्यावर पोहण्यासाठी गेला होता.

# बच्चू कडूंना दिलासा! अटकपूर्व जामीन मंजूर

अचलपूर



**अचलपूरचे** आमदार बच्चू कडू यांना न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. भाजपा आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत भाऊ अभिजीत तायडे यांच्या हत्येचा कट रचल्याच्या गंभीर आरोपप्रकरणी दाखल अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने काही अटींसह मंजूर केला आहे. अभिजीत तायडे यांची हत्या करण्याचा कट रचल्याचा आरोप बच्चू कडू यांच्यावर करण्यात आला होता. या आरोपामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणी चांदूरबाजार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर बच्चू कडू यांनी अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने त्यांना वैयक्तिक मुचलका आणि काही अटींसह अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. त्यानुसार, तपास अधिकाऱ्यांनी बोलावल्यास चौकशीसाठी हजर राहणे बंधनकारक राहणार आहे.

# अवकाळीची नुकसानभरपाई द्या मुळशीत शेतकऱ्यांचे आंदोलन

पुणे

**पुणे** जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकरी संघाच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले.

अवकाळी पावसामुळे कांदा, गहू, मका तसेच विविध फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी गारपिटीमुळे पिके पूर्णपणे जमीनदोस्त झाली असून, शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झाले असून, शासनाने तत्काळ पंचनामे करून योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, वारंवार होणाऱ्या अवकाळी पावसामुळे शेती करणे कठीण झाले असून, आर्थिक संकट अधिकच गडद होत आहे. त्यामुळे शेतकरी संघाने अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई तत्काळ द्या, अशी मागणी केली.

# आंबेडकर-फुले जयंती! फुलबाजारात फळांचे वाटप

मुंबई

**स्व. माँसाहेब** मीनाताई ठाकरे फुलबाजार व्यापारी मंडळाच्या वतीने भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.

या निमित्ताने सुप्रसिद्ध प्रबोधनकार सुधाकर अभंग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी



फुलबाजारातील कामगारांना फळांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेश सावंत व विभाग प्रमुख विशाखा राऊत यांची उपस्थिती होती.

# वैद्यकीय परिषद सदस्यांसाठी निवडणूक नाही! नामनिर्देशन पद्धत

मुंबई

**राज्यात** डॉक्टरांची नोंदणी आणि त्यांचे नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषद या वैधानिक संस्थेशी संबंधित अधिनियमात राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार परिषदेवरील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीऐवजी सरकार नामनिर्देशन पद्धतीने करणार आहे

सरकारचा हा निर्णय वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची स्थापना महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम,१९६५ अंतर्गत करण्यात आली आहे. या परिषदेच्या अधिनियमात सुधारणा करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचलनालयाच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीमध्ये डॉ.आनंद बंग, डॉ.कैलाश शर्मा, डॉ.विकास महात्मे आदी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश होता.

समितीने अन्य राज्यांमधील वैद्यकीय परिषदांच्या रचनेचा तसेच राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अधिनियम २०१९ चा अभ्यास करून अहवाल सादर केला आहे.

# महावितरणच्या भांडुप परिमंडलात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



मुंबई

**महावितरणच्या** भांडुप परिमंडलातील 'विद्युत' इमारतीच्या आवारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य अभियंता भांडुप परिमंडल संजय पाटील यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

बाबासाहेबांबद्दल संबोधित करताना पाटील म्हणाले की, बाबासाहेबांनी समाजासाठी जे केले त्यासाठी आपण त्यांचे सदैव ऋणी राहू. बाबासाहेब पहिले भारतीय होते ज्यांनी अर्थशास्त्रात कोलंबिया विद्यापीठात पीएचडीची पदवी घेतली. त्यांनी कधीही स्वतःचा विचार न करता समाजाच्या भल्यासाठी काम करण्याला प्राधान्य दिले. भारतीय राज्यघटनेच्या मसुदा कमिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी खूप मेहनत घेतली. त्यांनी दलित, महिला व अन्यायपीडित वर्गासाठी आपले जीवन समर्पित केले.

# दिल्ली-मुंबई महामार्गावर अपघात! ४ जणांचा मृत्यू

मुंबई

**मुंबई**-दिल्ली महामार्गावर राजस्थानातील अलवरजवळ प्रवाशांनी भरलेली बस आणि केमिकल टँकरची धडक झाली. बस आणि केमिकल टँकरची धडक इतकी जबरदस्त होती की, यात ४ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर ३० हून अधिक जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये बसचालक, एक महिला आणि दोन मुलांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तात्काळ रुग्णवाहिकेद्वारे पिनान येथील आरोग्य केंद्रात नेऊन प्राथमिक उपचार करण्यात आले. गंभीर जखमींना पुढील उपचारांसाठी अन्य रुग्णालयात हलवले. अपघातानंतर काही काळ एक्स्प्रेसवेवर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

# भीमा नदीपात्र कोरडे पडले शेतकऱ्यांची पिके संकटात

सोलापूर

**सोलापूर** शहराला उजनीतून पाइपलाइनद्वारे थेट पाणीपुरवठा सुरू झाल्यामुळे भीमेच्या पात्रात पाणी सोडण्यात आलेले नाही. त्याचा फटका नदीपात्रालगतच्या पिकांना बसला आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला उजनी कालव्यातून थेट मोकळ्या रानात पाणी सोडले जात असल्याचा प्रकार समोर आला आहे.

नदीकाठ आणि कालवा क्षेत्रातील शेतकऱ्यांनी तालुक्याच्या कृषी अर्थकारणाला गती दिली. मात्र, दरवर्षी भीमा नदी काठ हा वर्षातून पंढरपूरच्या चार मोठ्या वाऱ्या व सोलापूरच्या पिण्याच्या पाण्याच्या निमित्ताने नदीपात्रातून पाणी सोडले जायचे. त्यामुळे नदीकाठचा शेतकरी तग धरून होता. या भागाने जवळपास जिल्ह्यातील निम्म्या साखर कारखान्याला ऊस पुरवठादेखील केला. गेल्यावर्षी पूर परिस्थितीमुळे नदीकाठचा शेतकरी कोलमडला असतानाच आता नदीपात्रात पाणी सोडले



नसल्यामुळे अडचणीत येऊ लागला आहे. नदीपात्रातील पाण्याच्या पाळी लांबणीवर टाकल्याबाबतचा मुद्दा जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारात चर्चेला आला. त्यानंतर पाणी सोडण्यात आले. मात्र, आता सध्या पुन्हा पिके पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. तरीही पाणी सोडण्याचा निर्णय अद्याप झालेला नाही.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अपघातांमागचा घातपाती बेजबाबदारपणा

**अपघातांची** वेदनादायक शृंखला थांबायला तयार नाही. किंबहुना अपघातांवर कठोरपणे नियंत्रण आणावे यासाठी सरकारी पातळीवरून अक्षम्य निर्ढावलेपणा केला जातो आहे. कल्याणजवळ एका व्हॅनचा आणि सिमेंट मिक्सरची टक्कर होऊन झालेला अपघात आणि त्यात अकरा जणांचे गेलेले बळी म्हणजे रस्तोरस्ती मृत्यूचा खचच पाहायला मिळतो. अन्य कोणत्याही दहशतीपेक्षा ही रस्ते अपघातांची दहशत अत्यंत धोकादायक ठरते आहे. माणसाच्या जीवाचे मोल संपुष्टात आल्याचेच ते निदर्शक म्हणावे लागते. अशा या वाहनांच्या रस्ते दुर्घटनांना अपघात या श्रेणीमध्ये ढकलून दिले की सरकारची जबाबदारी संपते. आतादेखील अकरा जणांचे इतके दुर्दैवी बळी गेल्यानंतर राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी जी काही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे ती सरकारी स्तरावर सगळी जबाबदारी झटकण्याचा उत्तम नमुना ठरतो. झालेला अपघात दुर्दैवी आहे असे म्हणत असताना वाहन क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन जाण्याचा हा धोकादायक प्रकार होता. केवळ पाच जणांची क्षमता असताना अकरा जणांना कोंबून ही व्हॅन सुसाट धावत होती. अशा परिस्थितीत लोकांनीसुद्धा जबाबदारीने भान पाळले पाहिजे असे परिवहन मंत्र्यांचे म्हणणे आहे. याचा अर्थ वाहन चालकांकडून केला जाणारा बेजबाबदारपणा हा लोकांच्या प्रोत्साहनामुळे होतो. असा त्याचा निष्कर्ष काढला गेला. वाहनचालक क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी का नेतो, असे दुप्पट तिप्पट प्रवासी घेऊन जाण्याची त्याची हिंमत का होते. कारण रस्त्यावर त्याला प्रश्न विचारणारे पोलिसच नसतात आणि असले तरी त्यांना चिरीमिरी देऊन मॅनेज करता येऊ शकते. असा त्या वाहन चालकाला पूर्ण विश्वास असतो. याचा अर्थ क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहन नेले तर आपल्यावर कठोर कारवाई होऊ शकते, असा धाक किंवा शिस्त निर्माण करण्यात सरकारचे परिवहन खाते पूर्णपणे अपयशी ठरलेले आहे. आज राज्यामध्ये रोज क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी नेण्यापासून ते प्रवासी वाहतुकीची परवानगी नसतानाही बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांची शेकडोने संख्या आहे.

### जबाबदार झटकण्याचे प्रकार

कोणत्याही प्रकारचा रस्ते अपघात हा केवळ वाहन चालकाच्या चुकीने होतो आणि मग चालकाचे वाहनावरचे नियंत्रण सुटले आणि अपघात घडला असेही निष्कर्ष काढले जातात. परंतु वर्षभरातल्या अपघातांचा जर लेखाजोखा घेतला तर सत्तर ते ऐंशी टक्के अपघात हे नियमांची अंमलबजावणी न केल्याने होत असतात. नियमांची अंमलबजावणी न होणे याला वाहन चालकापेक्षाही परिवहन विभाग जबाबदार ठरतो. कारण वाहतूक पोलिसांकडून वाहन चालकांवर अनुशासनाची कोणतीच कारवाई होत नाही. वाहन चालवण्याचा परवाना, वाहनाची कार्यक्षमता प्रत्यक्ष वाहनाच्या वेगावरचे नियंत्रण, क्षमतेपेक्षा ज्यादा प्रवासी असणे या सगळ्याबाबतचे नियम केले गेले आहेत. पण त्या नियमांची कठोर आणि काटेकोर अंमलबजावणी करण्याचे काम वाहतूक विभागाकडून होत नाही ही आज वस्तुस्थिती आहे. काही अपघातही निश्चितपणे तांत्रिक बिघाडामुळे किंवा ऐनवेळी उद्भवणाऱ्या संकटमय परिस्थितीमुळे होत असण्याची शक्यता आहे. मात्र सर्वाधिक अपघात हे वाहतूक विभागाकडून नियम पाळून घेण्यात होत असलेल्या हलगर्जीपणातून होतात. मग अगदी मुंबई पुणे एक्स्प्रेस वे असो समृद्धी महामार्ग असो, म्हणजेच कोणत्याही महामार्गापासून ते जिल्हा तालुक्याला जोडणाऱ्या छोट्या रस्त्यांवर होणारे अपघात हे नियमांची अंमलबजावणी न केल्याचेच परिणाम ठरतात. वाहन चालक इतक्या बिनधास्तपणे नियम धाब्यावर बसवत असतो. त्याला त्याचे काही वाटत नाही. शहरातले सिग्नल्स तोडणे, वेगावर नियंत्रण न ठेवणे, वाहन चालवण्याचा योग्य तो परवाना नसणे, हेल्मेट न वापरणे अशा एक ना अनेक नियमांच्या उल्लंघनामुळे अपघातांना आमंत्रण मिळते. ज्याप्रमाणामध्ये अपघात होतात आणि एकट्या महाराष्ट्रात दरवर्षी वीस ते पंचवीस हजार लोकांचे बळी जातात ही गोष्ट अतिशय गंभीर स्वरूपाची ठरते आणि या अपघातांना सरकारचा घातपाती निर्ढावलेपणा जबाबदार ठरतो. मनुष्याच्या जीवाला कवडीमोल ठरवण्याचे काम सरकारकडूनच होते आहे. जर इतक्या मोठ्या प्रमाणावर रस्ते अपघातात बळी जात असतील तर ते रोखण्याकरीता वाहतूक पोलिसांची एक मोठी फौज तैनात करणे गरजेचे ठरते.

### वाहन संख्येच्या तुलनेत पोलीस हवेत

वाहतूक पोलीस संख्येने कमी आहेत म्हणजे रस्त्यावरील वाहनांच्या संख्येच्या तुलनेत वाहतूक पोलिसांची संख्या नगण्य ठरते. ज्याप्रमाणे लोकसंख्येच्या तुलनेमध्ये पोलीस दलाची संख्या आवश्यक ठरते. म्हणजे दर हजार लोकांमागे किमान दहा पोलीस जावेत. असा एक सर्वसाधारण निकष सांगितला जातो. परंतु तोही नियम पूर्ण पाळला जात नाही. त्याच पद्धतीने वाहनांच्या एकूण संख्येच्या प्रमाणामध्ये वाहतूक पोलिसांची संख्या वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. आता तर तंत्रज्ञान उपलब्ध झाल्याने ज्यादा प्रवासी असलेली वाहने ओळखणे वेग किंवा सिग्नल ओलांडणाऱ्या वाहनांना रोखणे, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून वाहतूक संदर्भातले सर्व नियम अधिकाधिक काटेकोरपणे पाळता येऊ शकतात. परंतु आज सरकारकडे ती इच्छाशक्ती दिसत नाही. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून या अपघातांची संख्या तातडीने नियंत्रणात आणता येऊ शकते. परंतु सरकारलाच ते करायचे नाही. अपघाताचा शिक्का मारून स्वतःची नैतिक जबाबदारी झटकण्याचा दुर्दैवी प्रकार ठरतो. कल्याणजवळ झालेला अपघात आणि त्यात अकरा जणांचे गेलेले बळी सरकारच्याच बेदरकार प्रशासनाचे बळी ठरतात. जोपर्यंत वाहतूक नियमांची कठोरपणे अंमलबजावणी होत नाही. तोपर्यंत हा घातपाती अपघातांचा प्रकार चालूच राहील. सरकारची ७५ ते ८० टक्के जबाबदारी आहे. गेल्याच आठवड्यात दिंडोरी येथे असाच विचित्र अपघात झाला आणि रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या एका विहिरीत वाहन कोसळून सात विद्यार्थी मृत्युमुखी पडले. मग ही विहीर बुजवण्यापासून ते तिला कठडा बांधण्यापर्यंत सरकारी यंत्रणांनी कोणतीच काळजी घेतली नाही. अशाच बेजबाबदारपणाचे लाखो बळी दरवर्षी जात असतात.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

भेट आणि संवाद गरजेचा असतो. कारण एखादी भेट बऱ्याच गैरसमजांची गाठ सोडवते आणि एखादा संवाद अनेक वाद मिटवतो.

## पंचांग



**बुधवार १५ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** चैत्र कृष्ण त्रयोदशी**
*** नक्षत्र - पूर्वा भाद्रपदी**
**जन्मराशी :- ००-०१ ते ०९-३७ कुंभ**
**०९-३७ ते २४-०० मीन**

**रवी उदय- ०६-२३**
**रवी अस्त- १८-५५**

प्रदोष, शिवरात्री, श्री अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी, संत गोरोबा काका पुण्यतिथी

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### मिक्स डाळीचे सांडगे



★**साहित्य** : -पाव किलो मटकीची डाळ, पाव कप चणा डाळ, पाव कप मुग डाळ, ७/८ लसूण पाकळ्या, जिरं (दोन छोटे चमचे), मीठ (चवीनुसार), लाल तिखट (चवीनुसार), हळद, हिंग

★**कृती**:- - सर्वप्रथम, तिन्ही डाळी स्वच्छ धुवून घ्या. त्यात पाणी घालून रात्रभर भिजत ठेवा. डाळी भिजल्यानंतर त्यातील पाणी काढून घ्या. पुन्हा एकदा पाण्याने डाळी स्वच्छ धुवून घ्या, यामुळे डाळीतील आंबूसपणा निघून जाईल. आता एका बाऊलमध्ये तिन्ही डाळी एकत्र मिक्स करा. त्यात ६ - ७ लसणाच्या पाकळ्या व जिरं घाला. आता संपूर्ण साहित्य एकत्र मिक्स करा.

मिक्सरच्या भांड्यात साहित्य घालून मिश्रणाची भरड तयार करा. डाळी जास्त बारीक करू नये. भरड तयार झाल्यानंतर एका डिशमध्ये काढून घ्या. त्यात चवीनुसार मीठ, लाल तिखट, हळद, आणि हिंग घाला. आता हे संपूर्ण मिश्रण हाताने मिक्स करा.

मिश्रण मिक्स झाल्यानंतर एक पाठ अथवा प्लास्टिक पेपर घ्या. त्याला तेलाने चांगले ग्रीस करून घ्या. आता त्यावर छोटे - छोटे सांडगे पाडून घ्या. व उन्हामध्ये हे सांडगे वाळवण्यासाठी ठेवा. निदान दोन दिवस तरी सांडगे उन्हामध्ये वाळवत ठेवा. सांडगे पूर्णपणे सुकल्यानंतर हवाबंद डब्यात सांडगे साठवून ठेवा.

## क्रीडा

# कोलकाताची पराभवाची मालिका कायम

## चेन्नई संघाचा ३२ धावांनी सलग दुसरा विजय



**चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर आज झालेल्या २२ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सने कोलकाता नाइट रायडर्सला ३२ धावांनी पराभूत केले. चेन्नईने कोलकाताला विजयासाठी १९२ धावांचे आव्हान दिले होते. या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या कोलकाताला चेन्नईच्या गोलंदाजांनी ७ बाद १६० धावांपर्यंत रोखले. या सलग दुसऱ्या विजयासह चेन्नईचा संघ आयपीएलच्या गुणतालिकेत ४ गुणांसह आठव्या स्थानावर पोहोचला. कोलकाता संघाने अद्याप एकही सामना जिंकला नाही. चेन्नईच्या विजयात नूर अहमदने ३ विकेटचे योगदान दिले.**

■ चेन्नई

**कोलकाताने** टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. चेन्नईची धावसंख्या २.१ षटकात २५ अशी झाली असताना कर्णधार ऋतुराज गायकवाड संजू सॅमसनची साथ सोडून माघारी परतला. त्याने ६ चेंडूत ७ धावा केल्या. सॅमसन आणि आयुष म्हात्रे यांनी कोलकाताच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवून चौकार-षटकार ठोकले. या जोडीने संघाची धावसंख्या ५.५ षटकांत १ बाद ७२वर पोहोचवली. मग आयुष म्हात्रे षटकार मारण्याच्या नादात सीमारेषेवर झेलबाद झाला. त्याने १७ चेंडूत २ षटकार आणि ६ चौकारांसह ३८ धावा केल्या. सॅमसन ३२ चेंडूत ४८ धावांवर बाद झाल्यानंतर डेवाल्ड ब्रेविस आणि सरफराज खान या जोडीने आक्रमक फलंदाजी केली. ब्रेविसने २९ चेंडूत ४१ धावा करुन माघारी परतला. १८ चेंडूत २३ धावांवर खेळत असताना सरफराजचा सुनील नरेनने त्रिफळा उडवला. शिवम दुबे आणि जेमी ओव्हरटन अनुक्रमे १३ आणि ७ धावा करुन नाबाद राहिल्यामुळे चेन्नईने निर्धारित षटकात ५ बाद १९२ धावा केल्या.

या धावसंख्येचा पाठलाग करताना कोलकाताची सुरुवात धिमी झाली. फिन ॲलनला अंशुल कंबोजने एका धावेवर बाद केले. सुनील नरेनलाही फारसे काही करता आले नाही. तो २३ धावा करुन बाद झाला. त्यामुळे कोलकाताची ४.२ षटकांत २ बाद २९ धावा अशी दयनीय अवस्था झाली. त्यात चेन्नईच्या गोलंदाजांनी आक्रमक गोलंदाजी करुन कर्णधार अजिंक्य रहाणे आणि रघुवंशी यांच्यावर चांगलेच अंकुश ठेवले. रघुवंशी १९ चेंडूत २७ धावा करुन माघारी परतला. मग नूर अहमदने ११ व्या षटकांत अजिंक्य रहाणे (२८) आणि कॅमेरॉन ग्रीनला (०) बाद केले. रिंकू सिंगही ६ धावांवर बाद झाल्याने कोलकाताची अवस्था १२.५ षटकांत ६ बाद ९० अशी झाली. रोव्हमन पॉवेल आणि मनदीप सिंग यांच्यासह अन्य फलंदाजांना आपल्या संघाला विजय मिळवून देता आला नाही. कोलकाता संघ २० षटकांत ७ बाद १६० धावांवर गारद झाल्याने चेन्नईचा ३२ धावांनी विजय झाला.

# राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेत ठाण्याने बाजी मारली

■ नवी मुंबई

**नवी** मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने वाशी येथे सुरू असलेल्या ६० व्या राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेच्या महिला सांघिक गटात ठाण्याने बाजी मारली. ठाणे संघाने साखळी गटात सर्वाधिक १० गुणांची कमाई करून प्रथम क्रमांक पटकावला. तर मुंबई संघाला उप विजेतेपदावर समाधान मानावे लागले. मुंबईने ८ गुणांची कमाई केली होती.

शेवटच्या साखळी सामन्यात समृद्धी घाडीगावकर (ठाणे) हिने सोनाली कुमारी (मुंबई) हिचा २५-०, २५-० असा पराभव केला. तर मधुरा देवळे (ठाणे) हिने अंबिका हरिथ (मुंबई) हिचा २५-०, २५-२४ असा पराभव केला. चैताली सुवारे आणि वीणा चव्हाण (ठाणे) जोडीने ऐशा खान व मिताली पाठक (मुंबई) जोडीवर २-१८, २२-४, २५-० असा विजय मिळवला. तिसऱ्या क्रमांक प्राप्त केलेल्या रत्नागिरी संघाने साखळीत ४ गुणांची कमाई केली होती.

# पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची मुझारबानीवर २ वर्षांची बंदी

■ इस्लामाबाद

**आयपीएल** खेळण्यासाठी झिम्बाब्वेच्या वेगवान गोलंदाज ब्लेसिंग मुझारबानीने पाकिस्तान सुपर लीगमधून आपले नाव मागे घेतले होते. त्यानंतर त्याच्यावर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने कारवाई करुन २ वर्षांची बंदी घातली.

पाकिस्तान सुपर लीगच्या इस्लामाबाद युनायटेडशी केलेला करार मोडून तो आयपीएलच्या कोलकाता नाइट रायडर्स संघात सामील झाल्यामुळे हा निर्णय घेतला. त्याला आयपीएलसाठी कोलकाताने बांगलादेशचा मुस्तफिजुर रहमान यांच्या जागी संधी दिली. तो इस्लामाबाद युनायटेडकडून खेळणार होता, आयपीएलची संधी मिळताच त्याने पाकिस्तान सुपर लीगमधून माघार घेतली. याला पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने करारभंग मानले व कायद्याच्या माध्यमातून कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू केली, ज्याचा परिणाम म्हणून २ वर्षांची बंदी लागू झाली.

# बंगळुरू अव्वल स्थानावर झेप घेणार! लखनौशी आज लढत

■ बंगळुरू

**बंगळुरूच्या** एम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये आज होणाऱ्या आयपीएलच्या २३ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात लढत होणार आहे. हा सामना जिंकून बंगळुरू आयपीएलच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर झेप घेण्याच्या तयारीत आहे, तर लखनौचा संघ विजयासह चौथ्या स्थानावर पोहोचण्याचा प्रयत्न करणार आहे. जबरदस्त लयात असलेला सलामीवीर विराट कोहली, फिल



साल्ट आणि रजत पाटीदारकडून बंगळुरूच्या संघाला पुन्हा चांगल्या कामगिरीची अपेक्षा असेल.

आयपीएलच्या या हंगामात आतापर्यंत बंगळुरूने आतापर्यंत ४ सामने खेळले. त्यातील ३ सामन्यांत विजय मिळवला आहे, तर एका सामन्यात पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे बंगळुरू गुणतालिकेत ६ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. लखनौने देखील ४ सामने खेळले. त्यात २ सामन्यांत विजय आणि २ सामन्यांत पराभव स्वीकारावा लागला. परिणामी लखनौ गुणतालिकेत ४ गुणांसह सातवा स्थानावर आहे. आयपीएलमध्ये आतापर्यंत या दोन्ही संघांत ६ सामने खेळवले गेले आहेत. त्यातील ४ सामन्यांत बंगळुरुने बाजी मारली, तर लखनौने २ सामने जिंकले. या हंगामात बंगळुरुच्या फलंदाजांनी विरोधी गोलंदाजांवर सातत्याने दबाव आणला. विराट कोहली, फिल सॉल्ट, रजत पाटीदार, टिम डेव्हिड आणि देवदत्त पडिक्कल यांनी मिळून ४ सामन्यांमध्ये ५२ षटकार ठोकले.

# इनडोअर क्रिकेट जिल्हा पंच परीक्षा १ मे रोजी होणार

■ मुंबई

महा इनडोअर क्रिकेट असोसिएशनतर्फे जिल्हा पंच प्रमाणपत्र कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून १ मे रोजी ही परीक्षा होणार आहे. या नोंदणी प्रक्रिया सुरू असून १३ ते १८ एप्रिलदरम्यान नोंदणी करणाऱ्यांना ५०० रुपये सवलतीचे शुल्क लागू आहे, तर १९ ते २५ एप्रिलदरम्यान शुल्क १००० रुपये असेल.

२६ एप्रिल रोजी अभ्यासक्रम ऑनलाईन उपलब्ध करून दिला जाणार आहे. यासाठी https://mahaindoorcricket.com/umpire-registration/ या संकेतस्थळावर जाऊन आपली नोंदणी निश्चित करा. २७ ते ३० एप्रिलदरम्यान दररोज रात्री ८.३० वाजता ऑनलाईन सत्रांद्वारे पंच परीक्षेचे बारकावे शिकवले जातील. १ मे रोजी परीक्षा तर ३ मे रोजी निकाल जाहीर होईल. यशस्वी उमेदवारांना विविध स्पर्धांमध्ये अधिकृत पंच म्हणून संधी मिळणार आहे.

# दादर पश्चिममध्ये १८ एप्रिलला शालेय कॅरम स्पर्धेचे आयोजन

■ मुंबई

**आनंदराव** अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी ग्रुपतर्फे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून विनाशुल्क शालेय कॅरम आणि आंतर सहकारी बँक सांघिक कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. शालेय १६ वर्षांखालील मुलामुलींची पहिल्या टप्प्यातील निवड चाचणी कॅरम स्पर्धा १८ एप्रिल रोजी सिबिईयु सभागृह, दादर पश्चिम येथे होणार आहे.

स्पर्धेतील १६ विजेत्या-उपविजेत्यांना पुरस्कार असून त्यांना १ मेपासून होणाऱ्या सांघिक स्पर्धेसाठी थेट प्रवेश दिला जाणार असल्याची माहिती संघटन समितीचे पदाधिकारी प्रमोद पार्टे व जनार्दन मोरे यांनी दिली.

गतवर्षी कामगारांच्या मुलामुलींसाठी कामगार दिनानिमित्त साकारण्यात आलेल्या पूर्णपणे कॅरम उपक्रमास गतवर्षी लाभलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाची दखल घेऊन माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री व युनियनचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ यांनी कॅरम उपक्रमाचे सातत्य यंदाही कायम राखले. शालेय मुलामुलींच्या कॅरम स्पर्धा १८ व २५ एप्रिल रोजी दोन टप्प्यात होणार असून निवड झालेल्या खेळाडूंचे संघ निर्माण करण्यात येणार आहेत.

# कबड्डी स्पर्धा! स्वराज्य स्पोर्ट्स क्लबने विजेतेपद पटकाविले

■ मुंबई

**मुंबई** उपनगर कबड्डी असोसिएशनचे दिवंगत पंच यांच्या स्मरणार्थ सामनाधिकारी (पंच) मंडळ आयोजित प्रथम श्रेणी पुरुष गट आणि स्थानिक महिला कबड्डी स्पर्धेतील अंतिम सामन्यात स्वराज्य स्पोर्ट्स क्लबने महात्मा गांधी स्पोर्ट्स क्लबवर १४ गुणांनी पराभव करुन विजेतेपद पटकाविले. महात्मा गांधी स्पोर्ट्स क्लबने १९ आणि स्वराज्य स्पोर्ट्स अकॅडमीने ३३ गुण मिळवले.



महात्मा गांधी क्लबकडून सायली जाधवने उत्कृष्ट पकडी करून आपल्या संघाला विजयी करण्याचा प्रयत्न केला तिला पूजा चिंदरकर यांनी चढाया करून साथ दिली. परंतु महात्मा गांधी क्लबला आपला पराभव टाळता आला नाही. स्वराज्य स्पोर्ट्सकडून या याशिका पुजारी यांनी चौफेर चढाया करत त्यांना प्रतिक्षा तांडेलने सुंदर पकडी करून साथ दिली आणि आपल्या संघाला विजयी केले.

प्रथम श्रेणी पुरुष गटात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात पार्ले स्पोर्ट्स अकॅडमीवर स्वस्तिक क्रीडा मंडळाने २ गुणांनी विजय संपादन केला. स्वस्तिक क्रीडा मंडळाकडून अर्कम शेख आणि अक्षय बेर्डे यांनी अष्टपैलू खेळ करत आपल्या संघाला विजयी केले, अक्षय तावडे व प्रशांत पवार यांनी उत्कृष्ट खेळ करत आपल्या संघाचा पराभव रोखण्याचा प्रयत्न केला.

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in



## निधी दत्ता यांची मोठी झेप


'बॉर्डर २' या चित्रपटाच्या प्रचंड यशानंतर निर्माती निधी दत्ता आता आपल्या 'जेपी फिल्म्स' या निर्मिती संस्थेचा विस्तार करण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. केवळ युद्धपटांपुरते मर्यादित न राहता, आता त्या 'फँटसी ॲडव्हेंचर' म्हणजेच काल्पनिक साहसकथा आणि भारतीय हवाई दलावर आधारित चित्रपटांची निर्मिती करणार असल्याचे वृत्त समोर आले आहे. मध्यंतरी, निधी दत्ता यांनी 'बॉर्डर ३' च्या कामाला सुरुवात केल्याचे जाहीर केले होते. मात्र, आता त्या काही वेगळ्या विषयांना हात घालणार आहेत. एका महत्त्वाकांक्षी फँटसी ॲडव्हेंचर फ्रँचायझीवर त्या काम करत असून, या चित्रपटाचे चित्रीकरण देशभरातील विविध ठिकाणी केले जाणार आहे. या चित्रपटाचा लेखन प्रक्रियेत निधी स्वतः सहभागी असून सध्या कलाकारांची निवड प्रक्रिया सुरू आहे. आपल्या वडिलांचा म्हणजेच दिग्दर्शक जे. पी. दत्ता यांचा वारसा पुढे नेत निधी यांनी सशस्त्र दलांवरील चित्रपटांची परंपरा कायम ठेवली आहे. याच मालिकेतील पुढचे पाऊल म्हणून त्या भारतीय हवाई दलावर आधारित एका चित्रपटाची निर्मिती करत आहेत.



## कयादू कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाच्या भूमिकेत

बहुभाषिक अभिनेत्री कयादू लोहार सध्या तिच्या वैविध्यपूर्ण भूमिकांमुळे चित्रपटसृष्टीत चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. दाक्षिणात्य सुपरस्टार नानीची मुख्य भूमिका असलेल्या 'द पॅराडाइज' या आगामी भव्य फँटसी ॲक्शन-ड्रामामध्ये कयादू एका अत्यंत महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार असून, हा चित्रपट तिच्या तेलुगू चित्रपट कारकिर्दीला नवी दिशा देणारा ठरेल, अशी चिन्हे आहेत. या चित्रपटात कयादू सुब्बुलक्ष्मी नावाचे पात्र साकारत आहे. निर्मात्यांनी या भूमिकेचे वर्णन 'कधीही न चमकलेला तारा' (अ स्टार दॅट नेव्हर शाईन) असे केले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ती या चित्रपटात एका ग्लॅमरस अभिनेत्रीची भूमिका साकारण्याची शक्यता आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'फर्स्ट लूक'मध्ये कयादू एका झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवर बाहुलीसारख्या पेहराव करून सायकल चालवताना दिसत आहे. हे विरोधाभासी दृश्य प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारे ठरले आहे. आपल्या चाहत्यांसाठी ही भूमिका पूर्णपणे अनपेक्षित असेल, असा विश्वास कयादूने व्यक्त केला आहे.

## 'भूत बंगला'चा मार्ग मोकळा; पण...



अक्षय कुमारची मुख्य भूमिका असलेल्या 'भूत बंगला' या बहुप्रतीक्षित हॉरर कॉमेडी चित्रपटाच्या प्रदर्शनाचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने (सेन्सॉर बोर्ड) या चित्रपटाला 'यूए १६+' श्रेणीतील प्रमाणपत्र दिले असून, निर्मात्यांनी स्वेच्छेने केलेल्या बदलांनंतर चित्रपटाची लांबी आता १६४ मिनिटे ५२ सेकंद निश्चित करण्यात आली आहे. सुरुवातीला २ एप्रिल रोजी मिळालेल्या प्रमाणपत्रात चित्रपटाचा कालावधी १७४ मिनिटे ५७ सेकंद इतका नोंदवण्यात आला होता. मात्र, चित्रपट अधिक वेगवान आणि परिणामकारक करण्यासाठी निर्मात्यांनी स्वतःहून काही दृश्ये वगळण्याचा निर्णय घेतला. या ताज्या संपादनामुळे चित्रपटाच्या मूळ लांबीत तब्बल १० मिनिटे ५ सेकंदांची कपात झाली आहे. आता प्रेक्षकांना २ तास ४४ मिनिटे आणि ५२ सेकंदांचा हा चित्रपट चित्रपटगृहात पाहता येईल. या प्रक्रियेत निर्मात्यांनी तब्बल ६३ दृश्यांवर कात्री चालवली आहे. यामध्ये प्रामुख्याने 'ओ सुंदरी' या गाण्यातील ७२ सेकंदांचा आणि 'ओ रे ओ सावरिया' गाण्यातील २७ सेकंदांचा भाग वगळण्यात आला आहे.





## अहान आता गँगस्टरच्या भूमिकेत

'सैयारा' या आपल्या पहिल्याच चित्रपटातून प्रेक्षकांची मने जिंकणारा अभिनेता अहान पांडे आता एका पूर्णपणे वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिकेत दिसणार आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक अली अब्बास जफर यांच्या आगामी 'ॲक्शन-रोमान्स' चित्रपटात अहान गँगस्टरची व्यक्तिरेखा साकारत असल्याचे वृत्त आहे. या चित्रपटात अहानसोबत अनुभवी अभिनेता जिमी शेरगिल देखील महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहे. अहानने आपल्या पहिल्या चित्रपटात एका संकटात सापडलेल्या संगीतकाराची भूमिका केली होती. मात्र, आता गँगस्टरच्या भूमिकेसाठी त्याने जोरदार तयारी सुरू केली आहे. या भूमिकेची शारीरिक मागणी लक्षात घेता अहान सध्या 'हँड-टू-हँड कॉम्बॅट' म्हणजेच प्रत्यक्ष द्वंद्वयुद्ध आणि शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण घेत आहे. पडद्यावर आक्रमक आणि प्रभावशाली दिसण्यासाठी तो मेहनत घेत असल्याचे समजते.

## कार्तिक आर्यन आणि लव रंजन पुन्हा एकत्र



'प्यार का पंचनामा' आणि 'सोनू के टिटू की स्वीटी' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांनंतर कार्तिक आर्यन आणि दिग्दर्शक लव रंजन ही जोडी पुन्हा एकदा एकत्र येणार आहे. या नव्या चित्रपटाचे चित्रीकरण ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार आहे. गेल्या सहा महिन्यांपासून ही जोडी विविध विषयांवर चर्चा करत होती. अखेर त्यांनी एका अतिशय रंजक संकल्पनेवर शिक्कामोर्तब केले आहे. हा चित्रपट 'पंचनामा' मालिकेच्या धाटणीचा असून प्रेक्षकांना पुन्हा एकदा निखळ मनोरंजन अनुभवायला मिळणार आहे. लव रंजन सुरुवातीला एका ॲक्शन चित्रपटाचा विचार करत होते, मात्र नंतर त्यांनी आपल्या आवडत्या 'रोमँटिक-कॉमेडी' विषयाची निवड केली. ही भूमिका कार्तिकच्या प्रतिमेला अगदी चपखल बसणारी असल्याचे बोलले जात आहे.या जोडीने यापूर्वी बॉक्स ऑफिसवर मोठे यश मिळवले असल्याने, या नव्या प्रकल्पाकडूनही चित्रपटसृष्टीला मोठ्या अपेक्षा आहेत.

## 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये वरुण झळकणार?



'बॉर्डर २' मधील दमदार अभिनयानंतर अभिनेता वरुण धवन सध्या सिनेसृष्टीतील सर्वात चर्चेत असलेला कलाकार ठरला आहे. राष्ट्रभक्तीवर आधारित चित्रपटांच्या अनेक ऑफर्स त्याच्याकडे येत असतानाच, आता तो एका मोठ्या प्रकल्पाशी चर्चेत असल्याचे समजते. दिग्दर्शक विवेक रंजन अग्निहोत्री आणि निर्माते भूषण कुमार यांच्या 'ऑपरेशन सिंदूर' या चित्रपटासाठी वरुणला विचारणा करण्यात आली आहे. वरुणने या विषयामध्ये प्राथमिक रस दाखवला असून लवकरच तो संपूर्ण कथेचे वाचन करणार आहे. 'बॉर्डर २' च्या यशानंतर वरुण सैन्यदलाशी संबंधित किंवा युद्धपटांच्या निवडीबाबत अत्यंत सावधगिरी बाळगत आहे. हा प्रस्ताव त्याने स्वीकारल्यास विवेक रंजन अग्निहोत्री यांच्यासोबतची त्याची ही पहिलीच युती असेल. आपली मुलगी लारा हिच्यासोबत वेळ घालवण्यासाठी वरुणने अभिनयातून छोटा ब्रेक घेतला होता. मात्र, आता तो पुन्हा एकदा पूर्ण जोमाने कामावर परतला आहे. येत्या २२ मे रोजी त्याचा 'हाय जवानी तो इश्क होना है' हा चित्रपट प्रदर्शित होत आहे.

# राज्य सरकारला न्यायालयाने ठोठावला १ लाख रुपयांचा दंड



■ मुंबई

**नाशिकमधील** जमीन विक्रीच्या नोंदणीला बेकायदेशीरपणे रोखल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला १ लाख रुपयांचा दंड ठोठावला. न्यायालयाच्या आदेशाशिवाय हस्तक्षेप करण्याचा पोलिसांना कोणताही अधिकार नाही, ही कृती म्हणजे अधिकाराचा गैरवापर असल्याचे न्यायालयाने म्हटले. त्याचप्रमाणे न्यायालयाने अधिकाऱ्यांना दस्तऐवजाची नोंदणी करण्याचे आणि दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश दिले. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन.जे. जमादार यांनी ६ एप्रिल रोजीच्या

### मालमत्ता विक्री करार नोंदणी रोखण्याचे प्रकरण

आदेशात, नवरत्न लँड्स अँड इस्टेट प्रा. लि. आणि इतरांनी दाखल केलेली याचिका मंजूर केली आणि जमिनीच्या व्यवहाराच्या नोंदणीला प्रभावीपणे प्रतिबंध घालणारी पत्रे रद्द केली. हा वाद मूळतः नाशिक डायोसीसन कौन्सिल ट्रस्टच्या मालकीच्या जमिनीशी संबंधित आहे. हा एक सार्वजनिक ट्रस्ट असून, त्याने २००१ मध्ये आपल्या मालमत्तेचे काही भाग विकण्यासाठी धर्मादाय आयुक्तांकडून मंजुरी मिळवली होती. याचिकाकर्त्यांनी नोंदणीकृत विक्री करारांद्वारे या जमिनीचे काही भाग खरेदी केले होते आणि त्यांची नावे मालमत्ता अभिलेखांमध्ये रीतसर नोंदवली गेली होती.

# कल्याणमध्ये पोलीस ठाण्याच्या आवारात पत्नी-मेहुण्यावर हल्ला

■ कल्याण

**वालधुनी** परिसरात तन्वीर फरीद खानने पत्नी रुक्सारवर आणि तिचा भाऊ अस्लमवर पोलीस ठाण्याजवळ जीवघेणा हल्ला केला. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. अशोक नगर परिसरात राहणाऱ्या रुक्सारचा विवाह सुमारे आठ वर्षांपूर्वी तन्वीर फरीद खान याच्याशी झाला होता. विवाहानंतर सुरुवातीपासूनच हुंड्यासह विविध कारणांवरून रुक्सारचा छळ सुरू होता. पती तन्वीर, सासरा फरीद, दीर सद्दाम आणि नणंद शबाना यांनी तिला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचा आरोप आहे. या सततच्या छळाला कंटाळून रुक्सारने यापूर्वी आत्महत्येचा प्रयत्नही केला होता. या पार्श्वभूमीवर दोन्ही कुटुंबांमध्ये वाद मिटवण्यासाठी आणि तलाक प्रक्रियेवर चर्चा करण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती. मात्र, या बैठकीतच रुक्सारवर अमानुष मारहाण करण्यात आली. मारहाणीनंतर रुक्सार आणि तिचा भाऊ अस्लम यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्याकडे धाव घेतली. परंतु आरोपींनी त्यांचा पाठलाग करत पोलीस ठाण्याजवळच धारदार चाकू आणि दगडांनी हल्ला चढवला.

# दौंडमधील पुणे मध्यवर्ती बँकेच्या कर्मचाऱ्यांची शेतकऱ्याला मारहाण

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील दौंड तालुक्यात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मलठण शाखेतील कर्मचाऱ्याने एका शेतकऱ्याला मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर परिसरात संतापाची लाट उसळली. क्षय पांडुरंग आटोळे असे संबंधित बँक कर्मचाऱ्याचे नाव असून, त्यांनी भीमराव विठोबा पांढरे हे मारहाण केल्याचा आरोप आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये संबंधित कर्मचारी शेतकऱ्याला जमिनीवर पाडून मारहाण करताना दिसत आहे. यावेळी तो अर्वाच्य भाषेत शिवीगाळही करत आहेत. भीमराव पांढरे यांनी मलठण शाखेतील बँक कर्मचाऱ्यांविरोधात वरिष्ठांकडे तक्रार केली होती. त्याचाच राग मनात धरून अक्षय आटोळे यांनी दौंड तालुक्यातील लिंगाळी ग्रामपंचायतीसमोर पांढरे यांना मारहाण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पांढरे यांनी दौंड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अक्षय आटोळे यांनीही आपली बाजू मांडत पांढरे यांच्यावर आरोप केले आहेत. कर्ज अर्जातील त्रुटींवरून पांढरे यांनी बँकेत येऊन तसेच फोनवरून शिवीगाळ केल्याचा दावा आटोळे यांनी केला आहे. लिंगाळी ग्रामपंचायतीसमोर आपल्यालाही मारहाण झाल्याची फिर्याद त्यांनी पोलिसांकडे दिली आहे.

# चाकणमध्ये औद्योगिक क्षेत्रातून तरुणाचे अपहरण

■ पुणे

चाकण औद्योगिक क्षेत्रातील एका नामांकित कंपनीच्या गेटसमोरून ऋषिकेश कल्हाटकरचे (२६) अपहरण करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ऋषिकेश (२६) हा तरुण एका कंपनीच्या गेटसमोर उभा असताना आरोपींनी हल्ला केला. जुन्या वादातून राग मनात धरून आलेल्या आरोपींनी त्याला जबरदस्तीने गाडीत कोंबले. त्यानंतर अज्ञातस्थळी नेत त्याला मारहाण केली. या प्रकरणात पोलिसांनी सागर बाळू जावळे, नितीन संजय शिंदे, सौरभ अनिल ढोरे, अजय भरत गोपाळे, कुणाल प्रशांत चव्हाण आणि ओमकार यमराज कोरडे यांना अटक केली. अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेतले. आरोपींवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले.

# आंबेडकरांचे विचार कालसुसंगत ! मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन

■ मुंबई

**दादर** येथील चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी उपस्थित राहून बाबासाहेबांना अभिवादन केले. जागतिक अर्थव्यवस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही कालसुसंगत आहेत,



असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाबासाहेबांची थोरवी सांगताना केले. फडणवीस म्हणाले की, आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक दृष्टिकोन, चलनव्यवस्था आणि आर्थिक स्थैर्यविषयीचे विचार आजही अत्यंत कालसुसंगत आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेतील बदलांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित होते. राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले, आंबेडकरांनी दिलेले संविधान हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. त्यांच्या विचारांमुळे वंचित, पीडित आणि दुर्बल घटकांना आत्मसन्मान, समान संधी आणि न्यायाचा मार्ग मिळाला आहे. संविधानामुळे लोकशाही अधिक सशक्त झाली.

# राज्यात उष्णतेची लाट येणार अकोल्याचे तापमान ४३.१ अंश

■ पुणे

सूर्य तळपू लागल्याने उन्हाच्या झळांनी महाराष्ट्र तापला आहे. विदर्भात उन्हाचा चटका अधिक असून, अकोला येथे यंदाच्या

### दुपारी १२ नंतर घराबाहेर पडू नका

हंगामातील उच्चांकी ४३.१ अंश तापमानाची नोंद झाली आहे. उद्या १५ एप्रिलपासून पाच दिवस विदर्भासह राज्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुपारी १२ नंतर गरज असेल तरच घराबाहेर पडा, असे आवाहन पुणे हवामान विभागाने केले आहे. दरम्यान,राज्यात अकोला येथे यंदाच्या हंगामातील उच्चांकी ४३.१ अंश तापमानाची नोंद झाली आहे. पुढील पाच दिवस महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यात उन्हाचा पारा ४२ ते ४५ अंशांवर जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अकोला जिल्ह्याचा पारा पुढील दोन दिवसांत ४५ अंशावर जाण्याची शक्यता आहे.

# अधिवेशन पास घोटाळा तीन कर्मचारी निलंबित



■ मुंबई

**मुंबईत** अर्थसंकल्पीय अधिवेशनातील प्रवेश पास घोटाळा प्रकरणी विधानभवनातील लिपिक-टंकलेखक महेश पिराजी दुम्पलवार, मनोज आनंदा मोरबाळे आणि शिपाई स्वप्निल रमेश तायडे या तीन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. या तिघांना यापूर्वीच अटक करण्यात आली असून विधानभवनातील कर्मचारी असलेला चौथा आरोपी लवेश नाकाडे अद्याप फरार आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी निलंबनाच्या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर आदेश जारी करण्यात आले. या प्रकरणात उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या कार्यालयाच्या नावाने एमआयडीसीच्या लेटरहेडवर बनावट विनंतीपत्र तयार करून प्रवेश पास देण्यात येत असल्याचे समोर आले. असे कोणतेही पत्र आपल्या कार्यालयातून दिले नसल्याचे सामंत यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले होते. त्यानंतर सभापती प्रा. राम शिंदे यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले.चौकशीत बाबी उघड झाल्या असून या घोटाळ्यात विधानभवनातील अन्य कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचाही सहभाग असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# राज्यपालांच्या हस्ते अग्निशमन सेवा सप्ताहाचे उद्घाटन

■ मुंबई

**राष्ट्रीय** अग्निशमन दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील लोकभवन येथे अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुंबई अग्निशमन दल, एमआयडीसी आणि महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील १२ अधिकारी व जवानांना अग्निशमन सेवेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल जाहीर झालेली राष्ट्रपती पदके राज्यपालांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यावेळी म्हणाले की, गेल्या काही दशकांत अग्निशमन दलांसमोरील आव्हाने मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. नागरीकरण, उंच इमारती, भूमिगत मेट्रो आणि वाढते औद्योगिक क्षेत्र यामुळे आपत्कालीन परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली आहे. मोठ्या गोदामांपासून ते डेटा सेंटर्सपर्यंत विविध ठिकाणी आग लागण्याच्या घटना वाढत असून अग्निशमन दलाला आधुनिक आणि तांत्रिक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. अग्निशमन सेवा केवळ आग विझविण्यापुरती मर्यादित न राहता पायाभूत सुविधा, औद्योगिक संपत्ती आणि सार्वजनिक स्थळांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही पार पाडत आहे.


# खाणी सुरू ठेवण्यासाठी लाच अकोला जिल्हाधिकाऱ्यावर गुन्हा



■ अकोला

**अकोला** जिल्हाचे अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्याविरोधात लाच मागितल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खाण मालकाच्या तक्रारीनंतर एमआयडीसी पोलिसांनी ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अकोला जिल्ह्यात गौण खनिजाच्या सुमारे ७० खाणी असून, त्यामध्ये दगड, गिट्टी, क्रशर आणि मुरूम खाणींचा समावेश आहे. या खाणी सुरू ठेवण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी गायकवाड यांनी प्रत्येकी १५ हजार रुपयांची लाच मागितल्याचा, तसेच दबाव टाकल्याचा आरोप खाण मालक संघटनेचे अध्यक्ष विवेक बिजवे यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित खाण मालकांनी अकोल्यातील एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीसोबत काही ऑडिओ क्लिप्ही पुरावा म्हणून सादर करण्यात आल्या आहेत. तक्रार दाखल झाल्यानंतर सुमारे नऊ दिवसांनी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

# नवाकाळ शब्दकोडे-१५७६



**आडवे शब्द –**

१. कसदार ३. जिवाभावाचा सखा ७. कंद ९. आचारी ११. वडिलांची बहीण १२. पाताळलोक १३. लढवय्या १४. साठ सेकंद १५. आकलन, स्वीकार, सावट १८. छंद, आवाज १९. अभिमानी २०. डुक्कर २१. आकर्षक, लोभस २२. तीन बाजूंना भूमी असलेला समुद्र २५. गार २७. गोऱ्हा २८. कळ लावणारा विष्णूभक्त २९. बर्फ ३०. भगवान शंकर ३१. भरतीची वेळ ३२. भाजून काढणारे ३४. चहाचा पेला ३६. पिशाच्च ३७. मूषक ३८. वर्ष, संवत्सर ४०. औषध ४२. उदर ४४. विठ्ठलपत्नी ४५. जळून खाक झालेले ४६. एकाच छापाच्या वस्तू करणारा ४७. नष्ट, उद्ध्वस्त ४९. चेहरा ५०. पाणी ५१. दोन मोठ्या शहरांना जोडणारा पथ ५३. थोरवी ५५. रात्र ५९. कामाला मारलेली दांडी ६१. वानवा, बोंब ६३. यज्ञ ६४. बापजादे ६७. भांडखोर स्त्री ६९. निवडक ७२. मांडी ७३. शैली ७४. उदा. काकडी, कारली, भोपळा इ. ७६. लाड, नखरे ७७. कर्ज फेडण्यास अक्षम ७९. दंत ८०. जबाबदारी ८१. नलिका ८२. गणपती ८५. हात ८६. सातू ८७. ठोंब्या ८८. व्यवस्थित ८९. हत्ती ९०. वस्त्र ९२. दुर्दशा ९३. कमी किंमतीचे ९४. उणे ९६. कामदेव ९८. गंभीर अवस्थेतला रुग्ण ९९. सुळका १०१. सत्ता चांगल्या माणसाला देखील भ्रष्ट करते या आशयाचे वचन 'अत्युच्च पदी ××× ××××' १०४. प्रभुत्व, पगडा १०५. भगवान शंकराचे शस्त्र १०६. वर्तुळ १०७. आवड १०८. परिणाम, फलित १०९. लाज ११०. गोधडी

**उभे शब्द –**

१. गांधीजींची आंदोलन पद्धती २. चिता ३. शेतीची गुरे ४. आघाताची त्वचेवर खूण ५. अहंकार ६. तेरावी तिथी ८. वीज, बिजली ९. वाटप १०. 'भीमरूपी महारुद्रा ×××××× ×××' - समर्थ रामदास रचित मारूतीस्तोत्राची सुरुवात १६. विनाकारण १७. आजार १९. पैसेवाला २१. गणती २२. पाणी २३. मूस, ओतणी २४. रद्द केलेले २६. दुसऱ्यासाठी घेतलेला त्रास २७. रत्नागिरीजवळचे स्वामी स्वरुपानंद यांचे स्थान ३३. भिस्त ३५. प्रतिध्वनी ३६. जमीन ३७. वाळवंटात आढळणारा प्राणी ३९. सदोदित, दरवेळी (हिं.) ४१. कृष्णाची बहीण ४२. भांडे आपटल्यावर त्यावर पडलेला खड्डा ४३. प्रघात ४६. नेहमी-नेहमी ४७. नापीक जमीन ४८. 'जया अंगी मोठेपण ×× ××× ×××' (संत तुकाराम) ४९. तपस्वी ५२. अनुत्साह ५४. आक्रमण ५६. आपल्या लष्करात अनेक वर्षे असलेली रशियन विमाने ५७. पाषाण, शिला ५८. युग्म, दोन गोष्टी एकत्र ६०. टपाल ६२. किंमत ६४. अश्व ६५. कमी ६६. झुंज ६८. म्हशीची मागणी असणारी जात ६९. शेजारीण ७०. चोळीचा प्रकार ७१. अतिशय स्थूल ७२. सर्प, साप ७५. बंधू ७८. शिकाऱ्याचे लक्ष्य ७९. असुर ८१. नूतन ८३. सर्वज्ञात ८४. पदवी ८६. पशू ८७. डोकेदुखी, तिडिक ९१. सर्व घटकांचे योग्य प्रमाण, सारख्या वजनाचे, संतुलित ९२. राक्षस ९४. नवरदेव ९५. ढग ९७. नवी पालवी, तारुण्य ९८. हा वन्य पशू गुदगुल्या करून ठार करतो अशी समजूत आहे १००. वरणातील मुख्य घटक १०१. अल्प १०२. कमळाचे देठ १०३. शाहिराचे वाद्य १०५. तीनपट •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५७५ चे उत्तर**

**आडवे शब्द :** ३. येनकेन प्रकारेण ९. सूर्यनमस्कार १०. अष्टदिक्पाल ११. रत १२. झाड १३. बासरी १४. पाटव १५. नायगरा १६. ओदन १७. गार १८. पिता १९. रंक २१. लाजरा २२. जथा २४. जेता २५. ब्याडगी २७. कपट २९. यमल ३०. वळसा ३२. मस्ती ३३. वजनदार ३४. ताण ३५. सागर ३७. वराह ३९. खेटर ४०. जरासंध ४२. अधाशी ४४. शत ४५. बंडलबाज ४८. शीळ ४९. डाराडूर ५१. धरबंध ५३. सार ५५. खूण ५६. महाग ६०. जपान ६३. बायको ६५. धडधडीत ६६. नाना ६७. सण ६८. कस्पटासमान ६९. कचेरी ७०. प्रवाद ७१. वाळू ७२. धास्ती ७३. दूत ७४. वय ७६. घन ७७. चरा ७८. पतकर ८०. बचत खाते ८४. रया ८६. अधीन ८८. आपमतलबी ९१. सखेद ९३. भगीरथ प्रयत्न ९४. जरा ९५. डेरा

**उभे शब्द :** १. शर्यत २. समवयस्क ३. येरझारा ४. केळी ५. प्रहसन ६. रेघ ७. स्पष्टवक्ता ८. कोलकाता ९. सूरपारंब्या १०. अट १३. बादरायण संबंध १४. पार १६. ओज १७. गाथा १८. पितामह २०. कडवट २१. लाट २२. जलसा २३. बोळ २६. गीजर २७. कदाचित २८. पर ३०. वर ३१. सावधान ३४. तारा ३६. गरबा ३८. राशी ३९. खेकडा ४०. जहर ४१. धड ४३. पळ ४४. शरम ४६. लड्डू ४७. जसा ४८. शीण ५०. रामायण ५१. धग ५२. बंदी ५४. रज ५५. खून ५७. हास्यास्पद ५८. धेंड ५९. वडीलधारा ६१. पाण्याचे पितर ६२. अनाहूत ६३. बासमती ६४. हसरा ६५. धनवान ६८. कवायत ७०. प्रवचन ७३. दूर ७५. जाते ७६. घट ७९. कयास ८०. बधीर ८१. खाजगी ८२. सापत्न ८३. बैल ८५. सदरा ८७. संथ ८८. आय ८९. तख्त ९०. बीज ९२. खेडे

पान १ वरून

फज्जा उडाला. कार्यक्रमासाठी उभारण्यात आलेले मेटल डिटेक्टरच काही तरुणांनी हटवले. त्यामुळे विनातिकीट आणि विनासुरक्षा तपासणी अनेक जण कॉन्सर्टमध्ये शिरले होते. सुमारे ४,५०० तरुण-तरुणी कॉन्सर्टला उपस्थित होते. त्यातील विशीतील विद्यार्थीच जास्त होते. या कार्यक्रमाला येतानाच एका नामांकित इन्स्टिट्यूटमधील एमबीएच्या २५ विद्यार्थ्यांचा गटही सहभागी झाला होता. हे विद्यार्थी ५ ते १० जणांच्या उपगटांमध्ये कार्यक्रमस्थळी आले होते. यातील काही विद्यार्थ्यांनी 'एमडी' आणि 'एमए' सारख्या अमली पदार्थांच्या गोळ्यांचे सेवन केले होते. यातील तिघांनी जरा जास्तच म्हणजे प्रत्येकी दोन डोस घेतले. त्याचा ओव्हरडोस होऊन परिणाम काही वेळातच जाणवू लागला. या विद्यार्थ्यांना श्वसनाचा तीव्र त्रास जाणवू लागला. या विद्यार्थ्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण यातील एक तरुण आणि एक तरुणी रुग्णालयात मृत्युमुखी पडले. तर एका विद्यार्थिनीची प्रकृती चिंताजनक आहे. तिच्यावर उपचार सुरू आहेत. यानंतर उपस्थित इतर विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

# नेस्को सेंटर ड्रग सेवन प्रकरणातील ड्रग पुरवठादारासह ६ जणांना अटक

या प्रकरणात नेस्को सेंटरचे सुरक्षा कर्मचाऱ्यांना आज चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी या प्रकरणाशी संबंधित एकूण १२ जणांचे जबाब नोंदवले. त्यानंतर या विद्यार्थ्यांना ड्रग पुरवठा कुणी केला याचा तपास पोलिसांनी सुरू केला. या प्रकरणात मुख्य आयोजक विहान उर्फ आकाश सामल, नेस्को सेंटरचा व्यवस्थापक सनी जैन, मुख्य सुरक्षा व्यवस्थापक बालकृष्ण कुरुप, ड्रग पुरवठादार रौनक खंडेलवाल, ड्रग पुरवठादार आनंद पटेल आणि प्रतीक पांडे यांना अटक करण्यात आली. यातील आनंद पटेलचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी खडकपाडा पोलिसांनी पहाटे कल्याणमधील वायले नगर येथे धाड टाकली. सुरुवातीला दरवाजा उघडण्यास नकार देत त्याने पोलिसांना चकवा देण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी कारवाई करत त्याला ताब्यात घेतले.

नेस्को घटनेनंतर अमली पदार्थांच्या विक्रीवरून विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. उबाठाचे अंबादास दानवे म्हणाले की, ड्रगचे प्रकार इतके रुटीन झाले आहेत की आता कोण सापडतो आणि कसा सापडतो, हाच मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक मेडिकल कंपन्या बंद झाल्या आहेत. पण ड्रग तयार करणाऱ्या कंपन्या कार्यरत आहेत. परंतु अशा ड्रग्स विक्रेते आणि वापरणाऱ्यांवर कायद्याचा कोणताही धाक राहिलेला नाही.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मुंबईतील गोरेगावच्या नेस्को संकुलातील लाइव्ह म्युझिक कॉन्सर्टमध्ये दारू व ड्रगचा खुलेआम वापर करण्यात आला. ड्रगमुळे दोघांचे मृत्यू होईपर्यंत पोलीस व सरकारी यंत्रणा झोपल्या होत्या, आता कारवाईचे नाटक सुरू आहे. पण मुंबईतील एका भागात चार ते पाच हजार तरुण तरुणांची ड्रग पार्टी होते, याची कुणकुण पोलिसांना कशी लागली नाही. मुंबईतील ही घटना दोन मृत्यूमुळे उघड झाली. पण मुंबईतच नाही तर राज्याच्या कानाकोपऱ्यात ड्रगचा काळा धंदा सरकारच्या आशिर्वादाने सुरू असून भाजपा महायुतीच्या निर्लज्ज व नालायक सरकारमुळेच महाराष्ट्राची तरुण पिढी ड्रगच्या विळख्यात अडकली

शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही सरकारला सुनावले की, याची तातडीने चौकशी झाली पाहिजे. मुंबईचे पोलीस आयुक्त यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून महाराष्ट्राला आणि मुंबईकरांना नेमके काय घडले, हे स्पष्ट केले पाहिजे. हे सर्व प्रकार पोलिसांच्या डोळ्यासमोर होत असतील, तर ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. याचा मी जाहीर निषेध करते आणि यावर तातडीने गृह मंत्रालयाने कारवाई केली पाहिजे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे सारवासारव करताना म्हणाले की, आमचे सरकार प्रत्येक घटनेकडे संवेदनशीलपणे लक्ष देत आहे. अशा प्रकारचे बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांविरोधात, विशेषतः कोकेनसारख्या ड्रगविरोधात, मोठ्या कारवाया सुरू झाल्या आहेत. सरकार स्वतःहून कारवाई करत आहे. पूर्वी अशा कारवाया होत नव्हत्या. आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मजबूत जाळे तयार केले आहे, ज्यामुळे आता कोणीही सुटू शकत नाही.

# शिक्षकांना ६ टक्के व्याजासह थकीत रक्कम द्या

पान १ वरून

न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. याबाबत सरकारला जाब विचारतानाच खंडपीठाने याचिकाकर्त्या शिक्षकांना त्यांचे थकीत वेतन ६ टक्के वार्षिक व्याजाने देण्याचे आदेश देत याचिका निकाली काढली. २०१६ च्या शासन निर्णयानुसार, या शाळेतील शिक्षकांना २० टक्के वेतन अनुदान मंजूर झाले होते.

मात्र, पुढील टप्प्यात ४०टक्के अनुदान मिळताना शिक्षण विभागाची प्रशासकीय स्तरावर चूक झाली व या सात याचिकाकर्त्यांची नावे प्रस्तावातून वगळली गेली. प्रशासनाने न्यायालयात आपली चूक कबूल करत शिक्षकांना वाढीव अनुदान देण्याबरोबरच ६ टक्के व्याजासह थकीत रक्कम ३१ मे पर्यंत याचिकाकर्त्यांना देण्याचे शिक्षकांना वाढीव अनुदान देण्याबरोबरच ६ टक्के व्याजासह थकीत रक्कम ३१ मे पर्यंत याचिकाकर्त्यांना देण्याचे मान्य केली. तरीही याचिका प्रलंबित असताना वारंवार नवीन शासन निर्णय काढून या शिक्षकांना लाभापासून दूर ठेवले गेले.

# अमेरिकेने इराणला घेरले

पान १ वरून

अधिकार आम्हाला मिळाला पाहिजे. त्यावर लावलेले सर्व निर्बंध उठवले गेले पाहिजे. त्याचबरोबर अमेरिका आणि इस्त्रायलने गेल्या महिन्याभरात आमच्या देशावर केलेल्या हल्ल्यांमुळे आमचे सुमारे २७० अब्ज डॉलरचे (सुमारे २५ लाख कोटी रुपये) नुकसान झाले आहे. त्याची भरपाई आम्हाला मिळाली पाहिजे. तिकडे चीनची राजधानी बीजिंगमध्ये आज संयुक्त अरब अमिरातींतील अबू धाबीचे राजपुत्र शेख खालिद बिन मोहम्मद बिन जाएद अल नाहयान आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग यांची भेट झाली. या भेटीत जिनपिंग यांनी नाहयान यांच्यासमोर मध्य पूर्वेतील शांततेसाठी चार सुत्री प्रस्ताव दिला. चीनची सरकारी वृत्तसंस्था शिनहुआने याबाबतचे वृत्त दिले. त्यानुसार बैठकीत जिनपिंग यांनी सांगितले की, मध्य पूर्वेत शांतता राखण्यासाठी शांततापूर्ण सह अस्तित्वाच्या सिद्धांताचे पालन होणे आवश्यक आहे. मध्य पूर्व आणि आखाती देशांनी एकत्रितपणे व्यापक आणि टिकाऊ सुरक्षा आराखडा तयार करावा, असा आग्रह जिनपिंग यांनी धरला. आंतरराष्ट्रीय कायद्याचे तत्त्व पाळणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा जगाची पुन्हा एकदा 'बळी तो कान पिळी'सारख्या व्यवस्थेकडे वाटचाल सुरू होईल, असेही जिनपिंग यांनी सांगितले.

# बिहारमध्ये पहिल्यांदाच भाजपाचा मुख्यमंत्री

पान १ वरून

नव्हती. २०१५ मध्ये मला भाजपामध्ये सामील होण्याची संधी मिळाली. त्यानंतर पक्षाने जी जबाबदारी दिली ती मी पार पाडली. मला पक्षात विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाली आणि पक्षाने माझ्यावर विश्वास ठेवला. बिहारमध्ये जदयू व भाजपा असे एनडीएचे सरकार स्थापन झाल्यावर मला उपमुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला. २०२५ मध्ये पुन्हा एनडीएची सरकार आल्यावर मला गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. आज मला पुन्हा एक मोठी जबाबदारी देण्यात आली आहे आणि मी ती पूर्ण करीन.

भाजपाचे केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले की, नीतीश कुमार यांनी २० वर्षे बिहारची सेवा केली आणि राज्याचा चेहरामोहरा बदलला. त्यांनी बिहारला 'जंगलराज'पासून मुक्त केले. त्यांच्या कार्याचे उदाहरण संपूर्ण भारत देत आहे. त्यांनी मुलींना सायकली दिल्या, महिलांना आरक्षण दिले, दारूबंदी धोरण लागू केले आणि देशातील पहिले कृषी रोडमॅप आणले. आता सम्राट चौधरी हे त्यांचे काम अधिक वेगाने पुढे नेतील.

# नोएडात कामगार आंदोलन सुरूच

पान १ वरून

पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. सेक्टर-१२१ मधील एका सोसायटीमध्ये घरगुती कामगारांनीही वेतनवाढीसाठी आंदोलन केले. परिस्थिती तणावपूर्ण झाल्याने सोसायटी व्यवस्थापनाने पोलिसांना बोलावले. तर ग्रेटर नोएडातील कासना येथील युआयएल कंपनीमध्ये कामगार आणि पोलिसांमध्ये झटापट झाली. त्यात अनेक कामगार जखमी झाले.

पोलीस उपायुक्त शैव्या गोयल म्हणाल्या की, आज काही घरगुती काम करणाऱ्या महिलांनी वेतनवाढीची मागणी केली होती. या महिला कारखान्यातील कामगार नाहीत. तर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कमिशनर दीपक कुमार यांनी म्हटले आहे की, दोन्ही पक्षांशी काल सविस्तर चर्चा करण्यात आली. शेकडो लोकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि मागण्या लक्षात घेऊन समितीने शिफारसी केल्या आहेत.

जिल्हाधिकारी मेधा रूपम यांनी सांगितले की, कामगारांची मुख्य मागणी असलेली वेतनवाढ मान्य करण्यात आली आहे. याशिवाय इतरही काही निर्देश देण्यात आले आहेत. कामगारांचे वेतन दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी खात्यात जमा होईल. बोनस दरवर्षी नोव्हेंबरपूर्वी दिला जाईल. ओव्हरटाइमसाठी दुप्पट वेतन देण्यात येईल. साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी काम केल्यासही दुप्पट वेतन दिले जाईल. प्रत्येक ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक समिती स्थापन केली जाईल आणि तिचे अध्यक्षपद महिलांकडे असेल.

# डोक्यावर कॅमेरा! कामगारांचा व्हिडिओ

पान १ वरून

बदलत आले आहेत आणि ऑटोमेशन हा त्या प्रवासाचा भाग आहे. त्यामुळे त्याला विरोध करण्याऐवजी कामगारांनी नवीन कौशल्ये शिकून तंत्रज्ञानासोबत काम करण्याचे मार्ग शोधले पाहिजेत. अ‍ॅमेझॉन सारख्या कंपन्यांनी गोदामांमध्ये रोबोटचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू केला आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये कंपनीने जाहीर केले की त्यांच्या नेटवर्कमध्ये १० लाखांहून अधिक रोबोट कार्यरत आहेत. हे रोबोट वस्तू वर्गीकरण, पॅकिंग आणि हलविण्याचे काम करतात. अ‍ॅमेझॉनचे म्हणणे आहे की या सिस्टम कामगारांना मदत करण्यासाठी आहेत आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी आहेत. पण तरीही त्याचा परिणाम दुर्लक्षित करता येत नाही.


**जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४था मजला, विल्हाईन वाईल्ड हायस्कूलसमोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३. सीआयएन: L99999MH1992PLC066213
(माननीय एनसीएलटीच्या आदेश दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ नुसार परिसमापनाअंतर्गत कंपनी)

**ई-लिलावाकरिता जाहीर उद्घोषणा**
**नादारी आणि दिवाळखोरी संहेता, २०१६ अंतर्गत सूचना**

निम्नस्वाक्षरीकारांद्वारे तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, नादारी आणि दिवाळखोरी संहेता, २०१६ ("आयबीसी") च्या तरतुदी सहवाचिता त्याअंतर्गत बनविलेले नियम आणि विनियमनांनुसार कॉर्पोरेट ऋणकोच्या परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनामध्ये) ("कॉर्पोरेट ऋणको") च्या मालकीच्या संपत्तीच्या (खालील तक्त्यामध्ये वर्णन केलेली) 'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे', 'जसे आहे, तसेच', 'तेथे जे आहे', 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर', कोणत्याही प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाईशिवाय विक्रीकरिता बोली आमंत्रित करण्यात येत आहेत.

विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे इतर बाबींसोबत आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ आणि मालमत्ता विक्री प्रक्रिया ज्ञापनपत्र दिनांक १५ एप्रिल, २०२६ ("एएसपीएम") नुसार ई-लिलाव प्लॅटफॉर्म बँकनेट (पूर्वीचा ईबीक्रय) **https://ibbi.baanknet.com** ("ई-लिलाव प्लॅटफॉर्म") द्वारे करण्यात येईल.

**ई-लिलावाच्या महत्त्वाच्या दिनांकांचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| पात्रता दस्तऐवज आणि कलम २९ए हमी सादर करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | शुक्रवार, दि. १५ मे, २०२६, सायं. ८.०० |
| इसारा रक्कम अनामत ("ईएमडी") जमा करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | शुक्रवार, दि. १५ मे, २०२६, सायं. ८.०० |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | सोमवार, दि. १८ मे, २०२६, दु. ३.०० ते सायं. ५.०० |
| अंतिम विक्री मोबदला भरणा करण्याचा अंतिम दिनांक | निम्नस्वाक्षरीकारांद्वारे अंतिम विक्री मोबदला भरणा करण्याकरिता मागणी पत्र पारित केल्यापासून साठ (६०) दिवसांमध्ये |

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन | लिलाव आयडी | राखीव किंमत* (भारतीय रु.मध्ये) | इसारा रक्कम अनामत (भारतीय रु.मध्ये) | विस्तारयोग्य मूल्य (भारतीय रु.मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| २ | २०० चौ. मी., अकृषिक निवासी भूखंड, सर्व्हे क्र. ३६/ए/प्लॉट/१९ आणि यूएलपीआयएन १४५१८७५६४२९, गाव पाली, ता. सुधागड, जि. रायगड, महाराष्ट्र. (असेट आयडी: ३१५४) | ३३६१ | १२,५०,००० | १,२५,००० | ६२,५०० |

*इतर गोष्टींबरोबरच कर, आकारणी, प्रभार, शुल्क, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठी लागू असलेले सर्व आवश्यक खर्च वगळता. निम्न स्वाक्षरीकारांकडून कोणतेही प्रतिनिधित्व, हमी आणि नुकसानभरपाई दिली जाणार नाही.

**महत्त्वाच्या टिपा:**
१. ई-लिलाव वरील सूचिबद्ध मालमत्तेकरिता स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.
२. ही विक्री सूचना या लिंकवर बँकनेट येथे उपलब्ध असलेल्या, मालमत्तेची माहिती, घोषणापत्र, प्रतिज्ञापत्र आणि आयबीसीच्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेसाठी हमीपत्र आणि 'ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक अटी आणि शर्ती' समाविष्ट असलेल्या एएसपीएमसह वाचावी.
३. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि ईएमडी ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निर्धारित वेळमर्यादेमध्ये सादर करावेत.
४. संभाव्य बोलीदारांनी त्यांना आयबीसीच्या कलम २९अ अंतर्गत लागू असलेल्या मर्यादेपर्यंत कोणतीही अपात्रता नाही असे हमीपत्र सादर करावी आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, ईएमडी जप्त करण्यात येईल.
५. ई-लिलावाबाबत कोणत्याही प्रश्नासाठी कृपया परिसमापकांचे अधिकृत प्रतिनिधी **श्री. दर्शिल मधू (+९१-९५१५९५५२१४)** यांना "जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड: मालमत्ता विक्री - जमिनीचा तुकडा-पाली" या विषयासह jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com वर संपर्क साधावा.
६. हे स्पष्ट करण्यात येते की, ही सूचना विक्री करण्यासाठी निम्नस्वाक्षरीकारांकडून किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापक) कडून कोणत्याही प्रकारचे बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. निम्नस्वाक्षरीकारांनी घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.
७. परिसमापकास त्याच्या विवेकबुद्धीनुसार एएसपीएमच्या अटींमध्ये सुधारणा/बदल करण्याचा आणि लिलाव प्रक्रियेच्या तारखा समाविष्ट असलेल्या आणि त्यास मर्यादित न राहता, विक्री प्रक्रियेच्या वेळेत सुधारणा करण्याचा अधिकार आहे. एससीसीच्या सल्ल्यानुसार, परिसमापकास लागू कायद्याअंतर्गत अन्यथा प्रदान केल्यानुसार आणि त्याशिवाय, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया मागे घेण्याचा/रद्द करण्याचा अधिकार आहे.

सही/-
सतिश कुमार गुप्ता
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे परिसमापक
आयपी नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056
एएफए क्र. AA1/10056/02/311226/108454
एएफए वैधता दि. ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत
पत्रव्यवहाराचा पत्ता: ४०१-४०७, स्टर्लिंग सेंटर, ४था मजला, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३
ईमेल: liquidation.jet@gmail.com

दिनांक: १५ एप्रिल, २०२६
ठिकाण: मुंबई



**PUBLIC NOTICE**

This is to inform the Public at large that 1] Mr. Florence Damian Correa, 2] Smt. Marina Nervis Farro, 3] Shri. Milton D. Correa, 4] Smt. Muriel Walter Pereira, 5] Smt. Mercy Mario Valaderius, 6] Smt. Glory Levy Pereira, 7] Shri. Sydney Joseph Pereira, 8] Mr. Grenvile Ivan Britto, 9] Mrs. Sharon Russell Fernandes, 10] Smt. Dorothy Richard D'souza [hereinafter (1) to (10) shall collectively referred to as 'FIRST PARTY'], 11] Shri. Vivian Michael D'souza, 12] Smt. Marina @ M Blossom D'souza, 13] Smt. Sophia Michael D'souza, 14] Shri. Leo Michael D'souza 15] Smt. Creslida Titus D'souza, 16] Shri. Sanjay Jude Titus D'souza, 17] Shri. Avelino Michael D'souza, 18] Shri. Sheldon Francis D'souza, 19] Shri. Neil Joseph D'souza, 20] Smt. Bertha Joseph D'souza, 21] Shri. Kane Joseph D'souza, 22] Smt. Priya Joseph D'souza, 23] Vincent Joseph Pereira [hereinafter (11) to (23) shall collectively referred to as 'SECOND PARTY'] are the co-owners having undivided right, title and interest in the Properties mentioned in the Schedule herein below. It is further notified that Mr. Vivian Michel D'souza & others have filed Special Civil Suit No. 11/2019 against the Mr. Florence D Correa & ors for Declaration, Injunction, Partition and Possession in respect of Properties particular mention in Schedule (hereinafter "Said Suit") which is subjudiced before Hon'ble Civil Court (S.D.) Thane.

It is further notified that there is a possibility of creating third party interest in the entire area of the Properties mentioned in the Schedule by Second Party based on the **Mutation Entry No. 946, Certified on 10/03/1978 & 7/12** extract without any Decree of Partition of Hon'ble Civil Court, Thane in the Said Suit. If such an Agreement will be created, executed by the Second Party in Respect of the entire area of properties, then it will be illegal, null and void & that will not be binding upon First Party.

If any person enters into an Agreement with Second Party i.e. 1] Shri. Vivian Michael D'souza, 2] Smt. Marina @ M Blossom D'souza, 3] Smt. Sophia Michael D'souza, 4] Shri. Leo Michael D'souza 5] Smt. Creslida Titus D'souza, 6] Shri. Sanjay Jude Titus D'souza, 7] Shri. Avelino Michael D'souza, 8] Shri. Sheldon Francis D'souza, 9] Shri. Neil Joseph D'souza, 10] Smt. Bertha Joseph D'souza, 11] Shri. Kane Joseph D'souza, 12] Smt. Priya Joseph D'souza, 13] Vincent Joseph Pereira in respect of the properties mentioned in Schedule or part thereof without previous written permission & consent of First Party (Names written above), then First Party will initiate legal action of filling Police Case, Civil Suit against those persons & others at the risk as to cost & consequences of those persons & Second Party. All to take note of it carefully & not to do any type of transaction, Agreement etc., in respect of the Suit Properties or part thereof unless & until First Party gives Written Consent & permission in advance.

**SCHEDULE OF PROPERTIES**

| Sr. No | Survey No. | Hissa No. | Area Admeasuring (H= A= P) |
|---|---|---|---|
| 1. | 116 | 7 | 0.04.00 |
| 2. | 125 | 1 | 0.07.6 |
| 3. | 3 | 1 | 0.80.1 |
| 4. | 16 | 4 | 2.30.00 |
| 5. | 14 | 5 | 33.60.00 |
| 6. | 14 | 1/A | 0.28.7 |
| 7. | 48 | 1 | 1.50.80 |
| 8. | 198 | 6 | 0.15.2 |
| 9. | 198 | 9B | 0.01.3 |
| 10. | 198 | 10 | 0.7.3 |
| 11. | 198 | 14A | 0.07.8 |
| 12. | 198 | 15B/A | 0.01.3 |
| 13. | 203 | 4 | 0.08.10 |
| 14. | 116 | 5 | 0.18.2 |
| 15. | 245 | | 20.00.00 |
| 16. | 125 | 1 | 0.07.6 |
| 17. | 250 | | 0.13.00 |

Place :- Thane
Date :- 15/04/2026

Sd/-
(Mr. Florence D. Correa)
Address :- S/o. Damian Correa, House No. 126, Bakhol Street, Opposite Annie Apartment, Bhayander (West), Taluka & District :- Thane – 410 001.
Mobile No :- 9222225455

नवा काळ

• मुंबई | बुधवार १५ एप्रिल, २०२६ • पान -८

## बारामती-राहुरी निवडणुकीसाठी २३ एप्रिलला सार्वजनिक सुट्टी



**बारामती** - बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी गुरूवार, २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान होणार आहे. या मतदार संघातील मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबत अधिसूचना जारी केली असून, ही सुट्टी बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघात लागू राहणार आहे. या मतदारसंघातील जे मतदार कामानिमित्त बाहेर असतील, त्यांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे. ही सुट्टी राज्य व केंद्र शासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम तसेच इतर आस्थापनांनाही लागू असेल, असेही अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## जयंती नव्हे महापुरुषांचे विचार महत्त्वाचे
### राज ठाकरे यांचा सल्ला

■ मुंबई



**भारतीय** संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आज देशभरात उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट करत बाबासाहेबांना अभिवादन केले. या पोस्टमधून राज ठाकरे यांनी राजकारण्यांसह सर्वसामान्यांनाही अप्रत्यक्षपणे सुनावले आहे. जयंती आणि पुण्यतिथींना कर्कश डीजे लावून केवळ मिरवणुका काढण्याऐवजी महापुरुषांच्या विचारांचे पालन करणे अधिक महत्त्वाचे आहे, असा संदेश त्यांनी दिला.

राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांचा विशेष उल्लेख केला. राज ठाकरे म्हणाले की, जागतिक आणि देशांतर्गत घडामोडींमुळे रुपया कमकुवत होत असताना 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी: इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन' हा अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिणारे बाबासाहेब आठवतात. त्यांनी ब्रिटिश धोरणांमुळे भारतीय रुपयाचे अवमूल्यन कसे झाले आणि त्याचा सामान्य जनतेवर कसा परिणाम झाला, हे स्पष्ट केले. त्यांच्या सूचनांवरच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेचा पाया रचला गेला. स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांना केवळ राजकीय स्वातंत्र्य नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक न्यायही महत्त्वाचा वाटत होता. बाबासाहेब हे त्या पिढीतील अग्रणी नेते होते.

## तुंगनाथ मंदिराचे दरवाजे
### २२ एप्रिलला उघडणार

■ रुद्रप्रयाग

**उत्तराखंडमधील** तुंगनाथ मंदिर येथील कपाट २२ एप्रिल रोजी भाविकांसाठी उघडण्यात येणार आहे. भगवान तुंगनाथांची उत्सव पालखी २० एप्रिल रोजी मार्कण्डेय मंदिर येथून धामकडे प्रस्थान करणार आहे. या घोषणेनंतर भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. याचबरोबर मदमहेश्वर मंदिराचे दरवाजे २१ मे रोजी विधीपूर्वक उघडले जाणार आहेत. त्यासाठी उत्सव डोली १९ मे रोजी ओंकारेश्वर मंदिर येथून रवाना होईल. यंदा चारधाम यात्राही लवकर सुरू होत आहे. केदारनाथ मंदिराचे दरवाजे २२ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता उघडले जातील, तर बद्रीनाथ मंदिर २३ एप्रिल रोजी सकाळी ६:१५ वाजता भाविकांसाठी खुले होईल. तर गंगोत्री मंदिर आणि यमुनोत्री मंदिरांचे दरवाजे १९ एप्रिल रोजी अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर उघडले जाणार आहेत.

## पोलीस महानिरीक्षक कराळेंचे खरातशी संबंध
### १८२५ नंबरवरून कॉल! दमानियांचा आज धमाका

■ पुणे



**सामाजिक** कार्यकर्त्या अंजली दमानिया उद्या पत्रकार परिषदेमध्ये भोंदूबाबा खरात 'मोठा गौप्यस्फोट' करणार असल्याची घोषणा केली आहे. आज दमानिया यांनी आरोप केला आहे की, नाशिक विभागाचे पोलीस महानिरीक्षक दत्ता कराळे हे खरातच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. भोंदू अशोक खरातला तब्बल १८२५ नंबरवरून कॉल आले होते किंवा खरातने त्यावर कॉल केले आहेत. यात राजकारणी, आयजी व तहसीलदारांसह अनेकांची नावे आहेत. त्यांची नावे ऐकून सर्वांनाच धक्का बसेल. दमानिया यांनी राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांना या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे.

त्यांनी सोशल मीडियावर त्यांची काही छायाचित्रे शेअर केली. दमानिया यांच्या दाव्यानुसार, नाशिक विभागाचे पोलीस महानिरीक्षक दत्ता कराळे यांचे खरातसोबत केवळ जुजबी संबंध नसून त्यांचे तब्बल १८ कॉल रेकॉर्डवर आहेत. भोंदू अशोक खरात याच्या संपर्कात अनेक राजकारणी तसेच प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारी आहेत. जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही त्यांच्या 'दरबारात' हजेरी लावली आहे. १८२५ क्रमांकांवरून खरात याला अनेक फोन कॉल आले आहेत. काही वेळा खरातनेही त्या नंबरवर संपर्क साधला आहे. या व्यक्तीची पोहोच किती मोठी आहे हे खरेच कळत नाही.

## पंतप्रधान मोदींचे महिला आरक्षणावर महिलांना पत्र

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी देशभरातील महिलांना पत्र लिहून, संसद, विधानसभा आणि विधान परिषदांमध्ये महिलांना आरक्षण देण्याच्या उपक्रमाला मिळालेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, २०२९ मध्ये लोकसभा आणि विविध राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका महिलांसाठी पूर्ण आरक्षणासह झाल्यास भारतीय लोकशाही अधिक मजबूत आणि चैतन्यशील बनेल. अनेक क्षेत्रांमध्ये महिला उत्कृष्ट कामगिरी करत असताना, कायदेमंडळांमध्येही त्यांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे. भारतातील महिलांना त्यांच्या हक्कासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागू नये. दशकांपासून प्रलंबित असलेले हे वचन पूर्ण करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. मी माझ्या सहकारी नागरिकांसोबत तो संकल्प लवकरच प्रत्यक्षात आणण्याच्या विषयावर माझे विचार शेअर केले आहेत. महिला अनेक क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट काम करत आहेत, तेव्हा हे अगदी योग्य आहे की कायदेशीर संस्थांमध्येही महिलांचा सहभाग वाढावा.

## निपाणीत बाबासाहेबांचा अश्वारुढ पुतळा
### कर्नाटक सरकारतर्फे १ कोटीचा निधी

■ निपाणी



**महामानव** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आज देशभरात साजरी करण्यात आली. परंतु उल्लेखनीय बाब अशी की, यंदा बाबासाहेबांच्या कर्नाटकातील निपाणी भेटीचीही शताब्दी साजरी करण्यात आली. यावेळी निपाणीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारून त्यासमोर त्यांचा घोड्यावर बसलेला पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. त्यासाठी कर्नाटक सरकारने १ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. कर्नाटकच्या बेळगाव जिल्ह्यात निपाणीला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सात वेळा भेट दिली होती. पहिल्या भेटीत त्यांनी घोडेस्वारीचा आनंद लुटला होता. डॉ. आंबेडकर हे प्रथम ११ एप्रिल १९२५ रोजी निपाणीच्या सरकारी विश्रामधामात आले होते. त्यांनी दत्तोबा कराळे यांच्या घोड्यावर बसून सवारीचा आनंदही लुटला होता. ३० ऑक्टोबर १९३७ रोजी डॉ. आंबेडकरांनी निपाणी नगरपालिकेला भेट दिली होती. तत्कालीन नगराध्यक्ष देवचंद शाह यांनी त्यांचा पालिकेतर्फे मानपत्र देऊन सन्मान केला होता. बाबासाहेबांच्या सान्निध्यात आलेले डॉ. श्रीकांत वराळे यांच्या घरीही आंबेडकर आले होते.

## परतवाड्यातही अश्लील व्हिडिओ व्हायरल प्रकरण! आरोपी अटकेत

■ अमरावती

**नाशिकपाठोपाठ** अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील महिलांचे अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर या युवकाला पोलिसांनी अटक केली. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्याला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्याच्यावर अनेक तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून ब्लॅकमेल करत लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने सोशल मीडियाचा वापर करून, विशेषतः इन्स्टाग्राम आणि टेलिग्रामच्या माध्यमातून तरुणी व महिलांचे अश्लील व्हिडिओ प्रसारित केल्याचा आरोप आहे. संबंधित व्हिडिओमध्ये आरोपी महिलांसोबत अश्लील कृत्य करताना दिसत असल्याचा दावा करण्यात येत आहे. या प्रकरणात भाजपा आमदार प्रवीण तायडे यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलीस ठाण्यात पॉक्सो कायदा तसेच भारतीय न्याय संहिता कलम २९४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीचा मोबाईल जप्त केला असून त्यातून महत्त्वाचे पुरावे मिळण्याची शक्यता आहे.

## रायगड किल्ल्यावर प्री-वेडिंगचे शूटिंग
### शिवप्रेमी संतप्त! कारवाई करण्याची मागणी

■ रायगड

**स्वराज्याची** राजधानी असलेल्या किल्ले रायगडावर प्री-वेडिंग शूट केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर वाद निर्माण झाला आहे. या घटनेनंतर शिवप्रेमींनी तीव्र संताप व्यक्त करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे. यावरून रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी रायगडावर प्री-वेडिंग शूट केल्यास शिवभक्त धडा शिकवतील, असा इशारा दिला आहे.

रायडावर छत्रपती शिवाजी महाराज समाधीस्थळ परिसरात हे प्री वेडिंग शूट करण्यात आले आहे. नेमके हे चित्रीकरण कधी करण्यात आले आहे. हे स्पष्ट झालेले नाही. मात्र व्हायरल व्हिडिओत तरुण-तरुणी समाधीस्थळाजवळ प्री-वेडिंग शूट करताना दिसतात. त्यांच्या समवेत दोन छायाचित्रकारही आहेत. रायरेश्वराच्या मंदीर परिसरातून समाधीस्थळाकडे जाणाऱ्या दरवाजाजवळ हे चित्रण करण्यात आल्याचे दिसते. समाधीस्थळ परिसरात २४ तास पोलीस तैनात असतात, असे असूनही हे छायाचित्रण कसे करण्यात आले, पुरातत्त्व विभागाने या छायाचित्रीकरणाला परवानगी दिली होती का, असे या निमित्ताने उपस्थित झाले आहेत.

यावर बोलताना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी लग्नाची पत्रिका ठेवण्यास कोणतीही हरकत नाही.

## मंत्र्यांच्या डोक्यात हवा गेली आहे
### आ.संतोष बांगर यांचा घरचा आहेर

■ नांदेड

**शिंदे** गटाच्या तीन जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांचा मेळावा नांदेड शहरात आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात बोलताना हिंगोलीचे आक्रमक आमदार संतोष बांगर यांनी आपल्याच पक्षाच्या मंत्र्यांचे जाहीर वाभाडे काढले. ते म्हणाले की, काही मंत्र्यांच्या डोक्यात हवा गेली आहे, ते उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम करत आहेत.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या उपस्थितीत बांगर यांनी आपली नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, हे मंत्री उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम करत आहेत.

कार्यकर्त्यांचे फोन उचलत नाहीत की त्यांची कामे करत नाहीत. अशा मंत्र्यांना आता घरचा रस्ता दाखवण्याची वेळ आली आहे. मंत्र्यांनी जमिनीवर राहून काम करणे अपेक्षित आहे, मात्र तसे होताना दिसत नाही.

## त्र्यंबकेश्वर मंदिरातील दर्शनाचा काळाबाजार
### ट्रस्टचा विश्वस्त पुरुषोत्तम कडलगला अटक

■ नाशिक



**नाशिकमधील** त्र्यंबकेश्वर मंदिरातील व्हीआयपी दर्शनाच्या नावाखाली काळाबाजार केल्याच्या प्रकरणात श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टचा विश्वस्त आणि शरद पवार गटाचा कार्याध्यक्ष पुरुषोत्तम कडलग याला अटक करण्यात आली. या प्रकरणात कडलगचा पुतण्या गोटीराम पेहरे यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. काल रात्री अटक केल्यानंतर दोघांनाही आज न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने २० एप्रिलपर्यंत सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. ही सुनावणी न्यायमूर्ती ए. जी. बेहरे यांच्या न्यायालयात पार पडली.

त्र्यंबकेश्वर मंदिरात व्हीआयपी दर्शन करून देण्याच्या नावाखाली भाविकांकडून पैसे उकळले जात होते. कडलग यांच्यावर तीन भाविकांकडून ९ हजार रुपये घेतल्याचा आरोप आहे. दर्शनासाठी मोठे रॅकेट चालवले जात असल्याचाही संशय व्यक्त करण्यात आला आहे. काही नातेवाईकांच्या माध्यमातून भाविकांना थेट मंदिरात प्रवेश देण्यात येत होता. झटपट दर्शनासाठी एका व्यक्तीकडून २ ते ३ हजार रुपये घेतले जात होते. दररोज शेकडो भाविकांना अशा प्रकारे प्रवेश दिला जात असल्याचा संशय आहे.

## उन्हाळ्यात मध्य रेल्वेच्या १६८ अतिरिक्त गाड्या

■ मुंबई

**उन्हाळ्याच्या** सुट्टीत वाढणारी प्रवासी गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने १६८ अतिरिक्त उन्हाळी विशेष रेल्वे सेवा चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष गाड्या मुंबई ते चेन्नई, हैदराबाद, संतरागछी, बनारस, बंगळुरू तसेच पुणे ते गाझीपूर शहर आणि संतरागछी दरम्यान धावणार आहेत.

लोकमान्य टिळक टर्मिनस-बनारस मार्गावर 'शिक्षक विशेष' गाडीही चालवली जाणार आहे. गाडी क्रमांक ०११२५ ही ६ मे २०२६ रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सुटेल, तर गाडी क्रमांक ०११२६ ही १२ जून २०२६ रोजी बनारस येथून सुटणार आहे. याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-चेन्नई दरम्यान साप्ताहिक विशेष गाड्या (एकूण १६ सेवा) चालवण्यात येणार आहेत. गाडी क्रमांक ०१०१५ ही १९ एप्रिल ते ७ जून २०२६ दरम्यान प्रत्येक रविवारी रात्री ००.२० वाजता मुंबईहून सुटेल आणि त्याच दिवशी रात्री २३.३० वाजता चेन्नईला पोहोचेल.

तर परतीची गाडी क्रमांक ०१०१६ ही २० एप्रिल ते ८ जून २०२६ दरम्यान प्रत्येक सोमवारी पहाटे ४.०० वाजता चेन्नईहून सुटून दुसऱ्या दिवशी ०४.१५ वाजता मुंबईत पोहोचेल. या गाड्यांना दादर, ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, सोलापूर, कलबुर्गी, रायचूर, गुंटकल, कडपा, रेनिगुंटा आणि अरकोनमसह विविध स्थानकांवर थांबे देण्यात येणार आहेत.



मानखुर्द येथील मंडालेमध्ये प्लास्टिक साहित्य, सुका कचरा, लाकूड आणि भंगाराला आग लागल्यानंतर सर्व सामान अस्ताव्यस्त पडले होते. (छाया-दीपक साळवी)

## पुण्यात सांस्कृतिक कार्यक्रमात माओवादी हिडमाच्या गाण्यावर नृत्य

■ पुणे

**भारतरत्न** डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमामुळे वाद निर्माण झाला आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी ओ रे बंदूक वाले, या गाण्यावर नृत्य सादर केले. या गाण्यात माओवादी कमांडर माडवी हिडमा याचे उदात्तीकरण असल्याचा आरोप करण्यात येत आहे. तसेच 'जंगल का राजा हिडमा' या नावाचे नाट्यसादरीकरणही कार्यक्रमादरम्यान करण्यात आले. या कार्यक्रमाचा व्हिडिओ सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या घटनेची दखल पुणे पोलीस, दहशतवाद विरोधी पथक आणि समाजकल्याण विभागाने घेतली असून, या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे. या मागे कोणतीही नक्षलवादी विचारसरणी कार्यरत होती का, तसेच तरुणांना भडकावण्याचा कोणताही हेतू होता का, याची पडताळणी केली जात आहे. समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे म्हणाले की, प्राथमिक तपासात विद्यार्थ्यांनी हे गाणे अनावधानाने निवडल्याचे उघड झाले आहे. यूट्यूबवरील गाण्यांमधून केवळ संगीत आवडल्यामुळे या गाण्याची निवड करण्यात आली होती.

## इंदू मिलमधील आंबेडकर स्मारक कधी पूर्ण होणार
### संजय राऊत यांचा सवाल

■ मुंबई

**भारतरत्न** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी इंदू मिलमधील आंबेडकर स्मारकाचा मुद्दा पुन्हा एकदा उपस्थित केला. स्मारक कधी पूर्ण होणार हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकदा पत्रकार परिषद घेऊन जाहीर करावे,अशी मागणी राऊत यांनी केली.

खरेतर या सरकारला डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज या दोन्ही विभुतींचे नाव घेण्याचाही अधिकार नाही. मुलांची खेळाची मैदाने ताब्यात घेऊन ती बिल्डरांना द्यायची आणि त्यावर पंचतारांकित हॉटेल, मॉल उभारायचे असले प्रकल्प हे सरकार वेगाने मार्गी लावते. अशा प्रकल्पांमधून अब्जावधींचा मलिदा खायचा आणि तो पैसा पुन्हा आमदार-खासदार विकत घेण्यासाठी वापरायचा हे फडणवीस यांचे धोरण आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी प्रत्येक वेळी तारखांवर तारखा दिल्या जातात. मुख्यमंत्र्यांनी एकदा पत्रकार परिषद घेऊन जाहीर करावे की, बाबासाहेबांचे स्मारक कधी पूर्ण होणार, असे राऊत म्हणाले. विदर्भात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या खाण उद्योगांच्या मुद्यावरूनही राऊत यांनी सरकार आणि भाजपावर शेलक्या शब्दात टीका केली. विदर्भात स्टील कंपनीने अक्षरशः उत्पात माजवला आहे. ही कंपनी भाजपाची भागीदार असल्याप्रमाणे वारेमाप उत्खनन करत आहे.

## पुण्यात बैठकीला जाताना अपघातात बीएलओचा मृत्यू

**पुणे** - केंद्रीय निवडणूक आयोगाच्या 'मतदार यादी सखोल पुनर्निरीक्षण' (एसआयआर) मोहिमेच्या बैठकीला जात असताना लोहगाव येथे झालेल्या अपघातात बूथ स्तरीय अधिकारी (बीएलओ)म्हणून कार्यरत असलेल्या ४० वर्षीय प्राध्यापकाचा मृत्यू झाला. ज्ञानेश्वर रोटे असे प्राध्यापकाचे नाव आहे. ज्ञानेश्वर रोटे हे वडगाव शेरी मतदारसंघात बीएलओ म्हणून कार्यरत होते. उपजिल्हाधिकाऱ्यांनी बोलावलेल्या तातडीच्या बैठकीसाठी ते मंगळवारी दुपारी सुमारे साडेबारा वाजता दुचाकीवरून निघाले होते.धानोरी-लोहगाव रस्त्यावरील स्पार्क स्प्रिंग सोसायटीसमोर त्यांची दुचाकी घसरून ते रस्त्यावर आदळले. त्यात त्यांना गंभीर दुखापत झाली आणि रक्तस्त्राव झाला.

## आता मुंबईत खड्डे-स्वच्छता कामांवर 'झेन झी'ची नजर

**मुंबईतील खड्डे, स्वच्छता आणि नागरी समस्यांवर आता 'झेन झी' नजर ठेवणार आहे. मुंबई महानगरपालिका कारभारात आधुनिकता आणण्यासाठी एक विशेष पथदर्शी प्रकल्प राबवण्याच्या तयारीत आहे.**

■ मुंबई

**या प्रकल्पांतर्गत** १८ ते २५ वयोगटातील ५० तरुणांची 'सिव्हिक फेलोज' म्हणून नियुक्ती केली जाणार असून, त्यांच्यावर शहरातील खड्डे, स्वच्छता आणि सार्वजनिक वाहतुकीतील त्रुटींवर रिअल-टाइम लक्ष ठेवण्याची जबाबदारी सोपवण्यात येणार आहे. भाजपा नगरसेवक तेजिंदरसिंह तिवाना यांनी या संदर्भात नाविन्यपूर्ण प्रस्ताव मांडला आहे. 'मेयर नेक्स्ट झेन सिव्हिक फेलोज' या कार्यक्रमांतर्गत या ५० प्रशिक्षित तरुणांना इंटर्न म्हणून सामावून घेण्याची



शिफारस त्यांनी केली आहे. तंत्रज्ञान आणि डेटा-आधारित प्रशासनावर भर देणारा हा प्रस्ताव या महिन्याच्या शेवटी महापालिकेच्या महासभेत मांडला जाणार आहे.

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात १० नागरी प्रभागांमध्ये (वॉर्ड) हा प्रकल्प राबवण्यात येईल. निवडलेले इंटर्न प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन पाहणी करतील आणि त्याचा सविस्तर अहवाल सादर करतील. तसेच, मोबाईल ॲपच्या माध्यमातून तक्रारी थेट अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवल्यास तक्रार निवारणाची प्रक्रिया अधिक जलद होऊ शकते, असेही या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा